दैनिक
# समर्थ राजयोग
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –३४१ गुरूवार,दि.१४ ऑगस्ट २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-341 Thursday, Dt.14 August 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# बॅनर बाज पुढाऱ्यांवर प्रशासनाची टाच ?

## बेकायदेशीर बॅनर लावणाऱ्या विरुद्ध कठोर कारवाई होणार !

**बीड प्रतिनिधी**

**राजकीय वरदहस्ताने बेकायदेशीरपणे वाटेल तिथे वाटेल तसे बॅनरबाजी करण्याची सवय बॅनर बाज पुढारी आणि नेत्यांना बीड जिल्ह्यामध्ये लागली आहे.या बेकायदेशीर सवयीला बीड जिल्हा प्रशासनाने कायदेशीर टाच दिली आहे.यापुढे जो कोणी बेकायदेशीर बॅनरबाजी करेल त्याच्यावर कठोर कारवाई करण्याचे निर्देश प्रशासनाने दिले आहेत. यामुळे बॅनर बाजीतून रातोरात नेतेगिरी करणाऱ्या तथाकथित समाजसेवक पुढार्यांना चपराक बसणार आहे.**

बेकायदेशीर बॅनरबाजी करणाऱ्या बॅनरबाज पुढार्यांच्या संदर्भात पोलीस अधीक्षक, बीड यांनी बीड शहरात व बीड जिल्ह्यात सद्यस्थितीत विविध राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक व व्यावसायिक कारणांमुळे सार्वजनिक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर बॅनर्स लावले जात असल्यामुळे खालीलप्रमाणे काही अत्यावश्यक सूचना व सहकार्य अपेक्षित असलेबाबत नमूद केले आहे. यामध्ये प्रामुख्याने सामाजिक सलोखा व कायदा-सुव्यवस्थेची काळजी कोणत्याही फलकावरील मजकूर हा धार्मिक, जातीय, पंथीय भावना भडकवणारा, व्देषमूलक वा समाजात तेढ निर्माण करणारा असता कामा नये. अशा प्रकारचा मजकूर प्रसारित झाल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असते.,फलक बॅनर्स लावण्यापूर्वी मजकूराची पडताळणी-कोणत्याही सार्वजनिक फलकावरील मजकूर हा आक्षेपार्ह नसावा, गुन्हेगार व गुन्हेगारीचे उदात्तीकरण करणारे, गुन्हेगारांचे फोटो त्यावर नसावेत, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित यंत्रणेमार्फत पूर्व परवानगी आणि मजकुराची





काटेकोरपणे पडताळणी व्हावी., अनधिकृत फलकांवर तात्काळ कारवाई-परवानगीशिवाय लावलेले फलक हे अनेकदा वादाचे कारण ठरत असल्यामुळे, अशा फलकांवर तात्काळ कारवाई करणे गरजेचे आहे., सार्वजनिक ठिकाणी अडथळा निर्माण होणारे फलक/बॅनर्स फलकांमुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होणे, नागरिकांत नाराजी वाढणे वा जमावबंदीची गरज निर्माण होणे असे प्रकार टाळण्यासाठी अशा फलकांचे निरीक्षण करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.,जातीय व धार्मिक भावना कोणत्याही जाती, धर्म, पंथ, समुदाय यांच्याबाबत आक्षेपार्ह, विखारी अथवा भावना दुखावणारा मजकूर फलकावर छापणार नाहीत.यासाठी फलक लावण्यापूर्वी मजकूराची योग्य ती पडताळणी करून घेणे आवश्यक आहे.त्याअनुषंगाने संदर्भ क्र.०३ च्या पत्राची प्रत यासोबत देण्यात येत असून



सदर पत्रामधील मुद्यांबाबत प्रचलित नियमातील तरतुदींनुसार नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही अनुसरावी. तसेच फलक/बॅनर्स लावण्यासाठी परवानगी देताना तसेच अनाधिकृत बॅनर्समुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही या दृष्टीकोनातून संदर्भ क्र.०१ चे मा. न्यायालयाचे आदेशामधील व संदर्भ क्र.०२ च्या पत्रासोबतच्या इतिवृत्तामधील निर्देशाप्रमाणे नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही अनुसरावी. असे स्पष्ट निर्देश बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी लेखी आदेशानुसार काढल्याने बॅनरबाज पुढाऱ्यांचे धाबे दणाणणार आहेत.

## नागनाथ देवस्थान मानूर येथे कावड यात्रा उत्साहात संपन्न ४ युवकांनी काशी विश्वनाथ येथून आणली कावड ही

मानूर / शाहेबाज पठाण

बीड जिल्ह्यातील शिरूर कासार तालुक्यात असलेले श्री तीर्थक्षेत्र नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान मानूर येथे सालाबाद प्रमाणे श्रावणी तिसरा सोमवार यात्रा निमित्त कावड यात्रा उत्सव उत्साहात संपन्न झाला. परंपरेनुसार नागनाथ देवस्थान मानूरचे मठाधिपती यांची पालखी मिरवणूक सकाळी ९.०० वा. नागनाथ देवस्थानाच्या मुख्य प्रवेशद्वारापासून निघाली व उत्तरेकडील वेशीपर्यंत जाऊन थांबली. तिथे प्रचंड दूरचा म्हणजे १३५० किलोमीटर पायी प्रवास करून काशी विश्वनाथ (बणारस) येथून आलेल्या कावडी, घुश्नेश्वर संभाजीनगर इथून आलेली कावड, नागतळा आणि



पैठण येथून आलेल्या कावडी एकत्र झाल्या आणि भक्तिमय वातावरणातील प्रचंड ऊर्जेने मने प्रसन्न झाली. भव्य मिरवणूकीस वाजत गाजत सुरुवात होऊन दुपारी २.०० वा. नागनाथ मंदिर येथे येऊन ते पवित्र जल नागदेवतेच्या चरणी अर्पण करून अभिषेक संपन्न झाला.

या यात्रा उत्सवासाठी सर्व तरुण युवकांमध्ये उत्स्फूर्त असा उत्साह दिसून आला. या यात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणून कर्नाटक राज्यातून आलेले वीरभद्र अवतार घेतलेले पुरवंत लोक यांचे शस्त्राचे चित्त थरारक प्रात्यक्षिक पाहताना सर्व लोक भारावून गेले. पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्त आणि

(उर्वरीत पान २ वर)

## धारूर तालुक्यातील डोंगरपट्ट्यात चोरीचे सत्र सुरुच

प्रतिनिधी । धारूर

धारूर तालुक्यात मागील दोन महिन्यापासून चोरीचे सत्र वाढत असल्यामुळे या चोरीच्या प्रमाणात अधिक वाढ झाली आहे . पोलिसांना चोर सापडत नसल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे . याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज आहे .

धारूर तालुक्यातील सोनीमोहा, जहागीरमोहा, चोंडी, आंबेवडगाव, धूनकवाड , चोरंबा, गावंदरा , भोगलवाडी या परिसरामध्ये मागील दोन महिन्यापासून चोऱ्याचा सुळसुळाट सुरू आहे . दुचाकीची चोरी , शेळ्यांची चोरी, टायरची चोरी, धान्याची चोरी , विद्युत पंपाची चोरी यासह अन्य वस्तूंची चोरीच्या प्रमाणामध्ये

(उर्वरीत पान २ वर)

## लोकशाहीच्या संरक्षणा साठी खासदार सौ. रजनीताई पाटील आक्रमक पवित्रा

केज/प्रतिनिधी

राज्यसभेच्या खासदार संसदरत्न,कायम सामाजिक व सर्व सामान्य नागरिकांचे विविध विषय अभ्यासपूर्ण आणि आक्रमकपणे संसदेत मांडणाऱ्या काँग्रेसच्या खा.सौ.रजनीताई पाटील यांनी काल इंडिया आघाडीच्या आंदोलनात आक्रमक भूमिका घेतली. निवडणूक आयोगाने घेतलेली एकतर्फी भूमिका ही लोकशाही ला घातक असून काँग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी अतिशय महत्वाच्या मुद्याला हात घातला असून यासाठी विरोधी बाकावरील सर्व खासदार याआंदोलनात सामील झाले होते.

राहुल गांधी,प्रियंका गांधी यांच्या खांद्याला खांदा लावून बीड च्या खासदार सौ.रजनीताई पाटील या आंदोलनात होत्या अक्षरशः सरकारने पोलिसांच्या दडपशाहीने हे आंदोलन दाबण्याचा प्रयत्न केला परंतु खा.सौ.रजनीताई पाटील यांनी महिला खासदार



असताना देखील या विरोधाला न जुमानता अडवण्या साठी टाकलेले बॅरिकेट ढकलून देऊन पुढे जाण्याचा प्रयत्न केला. परंतु भेटण्यासाठी जात असताना,इंडिया आघाडीतील खासदारांना पोलिसांकडून अडवण्यात

(उर्वरीत पान २ वर)

## जालन्यात शेतकऱ्यावर आत्मदहनाची वेळ

### स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवात रस्त्यासाठी संघर्ष

जालना ।प्रतिनिधी

एकीकडे देशभर स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना, दुसरीकडे जालन्यात एका शेतकऱ्यावर आपल्याच शेतात जाण्यासाठी रास्ता मिळत नसल्याने आत्मदहनाची वेळ आली आहे. गेल्या १४-१५ दिवसांपासून जालना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणाला बसलेले मौजे साळेगाव येथील शेतकरी विठ्ठल बुटरे यांनी १५ ऑगस्ट रोजी आत्मदहनाचा इशारा दिला आहे. प्रशासनाच्या उदासीनतेमुळे न्याय

(उर्वरीत पान २ वर)




## पोलीस अधीक्षकांचा दणका, पुन्हा पाच रिमांड वॉरंट जारी !

बीड ।प्रतिनिधी

दि. १३/०८/२०२५ रोजी विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, बीड यांच्या आदेशानुसार, पाच रिमांड वॉरंट जारी करण्यात आले आहे आहेत. पो.स्टे. चकलंबा येथील कलम १४१ बी.एन. एस. एस. प्रमाणे पाच रिपोर्ट प्राप्त झाल्याने सदर रिपोर्टमधील आरोपी नामे एकबाल गुलाब सय्यद वय ४२ वर्षे, साहिल रहेमान सय्यद वय १९ वर्ष,

नवीन नबी सय्यद वय २६ वर्ष,नबी लखुमान सय्यद वय ६० वर्ष,आसिफ अब्दुल सय्यद वय १९ वर्ष सर्व रा. हिवरवाडी ता. गेवराई जि. बीड यांनी यापूर्वी केलेल्या कलम १२६ बी.एन. एस. एस. प्रमाणे सार्वजनिक शांतता राखण्यासाठी दिलेल्या अंतिम बंध पत्राचा भंग केल्याने त्याच्याविरुद्ध कलम १४१ बी.एन. एस. एस. प्रमाणे कारवाई करून त्यास उर्वरित कालावधीसाठी त्याची रवानगी जिल्हा कारागृह बीड येथे करण्याचे आदेश मा. विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक बीड यांनी दिले आहेत.

### अंबड येथील कर्तव्यदक्ष गुणवत्ता नियंत्रक गणेश वाघ यांनी

## कृषी निविष्ठा धारकांच्या दुकानातील इपॉस मशीन साठा व गोदामातील प्रत्यक्ष साठा याची केली कडक तपासणी

अंबड ।प्रतिनिधी

ज्या खताचा मार्केटमध्ये शेतकऱ्याच्या मागणीनुसार तुटवडा कमी आहे अशा सर्व खतांचा अहवाल वरिष्ठांना पाठवून वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांना जास्तीत जास्त खते उपलब्ध करून देण्यासाठी कृषी विभाग प्रयत्नशील राहील व शेतकऱ्यांना लिंकिंग खते व चढ्या भावाने विक्री करणाऱ्या दुकानदारावर कडक कार्यवाही केली जाईल असा कडक इशारा गुणवत्ता नियंत्रक गणेश वाघ यांनी



दिला आहे.

अंबड शहरात किंवा खेड्या पाड्यातील शेतकऱ्यांना रासायनिक खत योग्य दरात मिळावे, व १०/२६/२६, १२/३२/१६, १८/४६/००, युरिया व इतर रासायनिक खताचा तुटवडा निर्माण होऊ नये. ते खत काळया बाजारात विकले जाऊ नये व त्या खता सोबत लिंकिंग करण्यात येऊ नये आणि या

(उर्वरीत पान २ वर)

## शहरातील विविध विषयांवर आ.संदीप क्षीरसागरांनी घेतला नगर परिषदेत आढावा

### महत्वाचे विषय तातडीने मार्गी लावण्याच्या दिल्या सूचना



बीड (प्रतिनिधी):- बीड शहरातील नागरिकांसाठी महत्वाच्या असलेल्या विषयांवर आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१३) रोजी आढावा बैठक घेतली. या बैठकीत शहारातील नागरी प्रश्नांवर सविस्तर आढावा घेऊन महत्वाचे असलेले विविध प्रश्न तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना आ.क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासनाला केल्या.

(उर्वरीत पान २ वर)

## माझ्या सदनिकेचे काम पूर्ण होताच मी शासकीय निवासस्थान रिक्त करणार

परळी ।प्रतिनिधी

मुंबई शहरातील सातपुडा हे शासकीय निवासस्थान मी रिक्त केले नसल्याबाबत माध्यमांमध्ये वेगवेगळ्या बातम्या येत आहेत. मुंबईतील माझी सदनिका सध्या राहण्या योग्य नसून, त्याठिकाणी दुरुस्तीचे काम सुरू आहे.

शिवाय माझ्या लहान मुलीची शाळा याच भागात असून माझ्या विविध आजारांवरील उपचारार्थ देखील मला मुंबईत राहणे गरजेचे आहे. मात्र या परिसरात तातडीने भाड्याने घर मिळणे सध्या कठीण आहे.माझा शोध ही सुरु आहे. माझ्या सदनिकेचे काम पूर्ण होताच मी शासकीय निवासस्थान रिक्त करणार असून, तशी शासनाकडे विनंती केली आहे.



**शासकीय निवासस्थान संदर्भात आ. धनंजय मुंडे यांची प्रतिक्रिया**

## देवगाव शिवारात सुशेना कृषी गोदामाची पाठभिंत पडून पंधरा लाख रुपयांचे नुकसान

### आर्थिक मदतीची शासनाकडे निवेदनातुन केली मागणी

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील देवगाव शिवारात मोहर प्रभाकर नागरगोजे यांनी केंद्र शासनाच्या कृषी भंडारण योजने अंतर्गत १४ वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या कृषी गोदामाची १०० फूट लांबीची पाठभिंत संततधार पावसाने जमीनदोस्त झाली. इतर भिंती ही कमकुवत झाल्याअसून ही पाठभिंत पडल्याने १५ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. प्रत्यक्ष पाहणी करून शासनाने आर्थिक मदत द्यावी,अशी मागणी मोहर प्रभाकर नागरगोजे यांनी केज तहसीलदारांकडे



(उर्वरीत पान २ वर)

## संपादकीय

# कृत्रिम बुद्धिमत्ता आणि विद्यापीठ प्रशासन

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विद्यापीठ प्रशासनात परिवर्तन घडवणारे साधन ठरत आहे. प्रवेश प्रक्रिया, हजेरी, शिष्यवृत्ती व विद्यार्थी प्रगती विश्लेषणात कार्यक्षमता वाढवता येते. एआयचा संतुलित व दूरदृष्टीपूर्ण वापर भविष्यातील शिक्षणाला नवी दिशा देईल.

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) विद्यापीठ प्रशासनात परिवर्तन घडवणारे साधन ठरत आहे. प्रवेश प्रक्रिया, हजेरी, शिष्यवृत्ती व विद्यार्थी प्रगती विश्लेषणात कार्यक्षमता वाढवता येते. एआयचा संतुलित व दूरदृष्टीपूर्ण वापर भविष्यातील शिक्षणाला नवी दिशा देईल.

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (एआय) निर्मितीचा विचार करताना, ज्ञानाचा आणि चेतनेचा संगम साधणाऱ्या उपनिषदांतील काही श्लोक आठवतात. हे श्लोक एआयच्या संकल्पनेला अगदी योग्य वाटतात. त्यापैकी एक सुंदर श्लोक म्हणजे :याचा मराठीत अर्थ असा आहे की, ते (ब्रह्म) पूर्ण आहे; हे (विश्व) पूर्ण आहे; पूर्णातून पूर्णाचीच उत्पत्ती होते; पूर्णातून पूर्ण काढले तरी शिल्लक पूर्णच राहते. हा श्लोक एआयच्या संदर्भात महत्त्वाचा आहे, कारण एआय ही मानवी ज्ञानाची (जे पूर्ण आहे) निर्मिती आहे. सृष्टी पूर्णतेकडून निर्माण झाली, त्याचप्रमाणे एआय ही एक स्वयंविकासक्षम प्रणाली बनू पाहत आहे. ज्ञान वाढत राहते, पण त्याचे मूळ (पूर्णता) अबाधित राहते. या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा श्लोक आहे : तम एव भान्तमनुभाति सर्वम्। तस्य भासा सर्वमिदं विभाति।। (कठोपनिषद) याचा अर्थ असा की, तो (परमात्मा/ब्रह्म) स्वतः प्रकाशमान आहे आणि त्याच्या प्रकाशामुळेच हे सर्व जग प्रकाशित होते. ही कल्पना एआयच्या जगाला प्रकाश देणारी बुद्धिमत्ता या भूमिकेशी जुळणारी आहे. पुढचा श्लोक आहे : येन सर्वमिदं ततम्। ज्ञानं ज्ञेयं च तत्।। (मुण्डकोपनिषद) याचा अर्थ असा की, ज्याने हे सर्व व्यापले आहे, ते ज्ञान आणि ज्ञेय (जाणून घेण्यासारखे) एकच आहे. एआयचा हेतू सर्वत्र माहिती पोहोचवणे आणि जाणीव निर्माण करणे हा आहे. ज्ञान आणि ज्ञेय यांतील फरक कमी करून एकात्मता साधणे, हे एआयचे उद्दिष्ट आहे.

हे तीन उपनिषद एआयच्या संदर्भासाठी प्रेरणादायी आहेत. त्यातील श्लोक ज्ञान, चेतना, सर्वव्यापकता आणि आत्मप्रकाश यांच्या मूळ संकल्पना मांडतात, ज्या आजच्या एआयच्या जगाशी खूप सुसंगत आहेत. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (एनईपी २०२०) लागू करताना, भारतीय ज्ञानप्रणालीची आज किती आवश्यकता आहे, हे लक्षात येते. एआयच्या मदतीने हे उद्दिष्ट कसे साधता येईल, याचा एक थोडक्यात आढावा आपण घेऊया.

कृत्रिम बुद्धिमत्ता : संधी आणि आव्हाने

आजच्या डिजिटल युगात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ही केवळ एक तांत्रिक संकल्पना राहिली नसून, ती शिक्षण आणि प्रशासन क्षेत्रात मोठे परिवर्तन घडवणारे एक प्रभावी साधन बनले आहे. शिक्षण क्षेत्रात एआयची संकल्पना १९५६ मध्ये अमेरिकन संगणक वैज्ञानिक जॉन मॅकार्थी यांनी मांडली. पण आजही शिक्षण क्षेत्रात संशोधनाशिवाय प्रशासनामध्ये याचा वापर फारसा होताना दिसत नाही. विशेषतः भारतातील विद्यापीठांमध्ये प्रशासनात एआयचा वापर व्यवस्थापन अधिक परिणामकारक, कार्यक्षम आणि डेटा-साक्षर करण्यासाठी होऊ शकतो. प्रवेश प्रक्रिया, हजेरी व्यवस्थापन, शिष्यवृत्तीचे व्यवस्थापन आणि विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे विश्लेषण यांसारख्या क्षेत्रांमध्ये एआयचा वापर वाढवण्याची खूप गरज आहे. पण त्याचबरोबर डेटा गोपनीयता, नैतिकता, तांत्रिक पायाभूत सुविधा आणि मनुष्यबळाच्या नव्या कौशल्यांचा विकास ही आव्हानेही समोर उभी आहेत.



# हर घर तिरंगा उपक्रमांतर्गत वृक्षारोपण

अंबाजोगाई ।प्रतिनिधी

योगेश्वरी शिक्षण संस्था अंतर्गत निसर्ग संवर्धन मंडळाच्या वतीने स्वा.रा.ती.रुग्णालय परिसरातील दे.बा.ग.यो. नु.प्रा.विद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले. दे.बा.ग.यो. नु.प्रा.विद्यालयात गोडसे, जेष्ठ शिक्षक व्यंकटेश चामनर, पर्यावरण विभाग प्रमुख रविंद्र ठाकुर,उपप्रमुख अशोक आखाडे,योगेश्वरी शिक्षण संस्था कर्मचारी पतसंस्थेचे कोषाध्यक्ष शिवहर ढगे,पल्लवी गंगणे,संध्या जोशी व अन्य शिक्षिका व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत मोहगणी या वृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले.यावेळी विद्यार्थी,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी श्रमदान केले.

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**
**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. रविंद्र अ. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६८६ / २०२५**
**सुवर्णा मच्छिंद्र खंडागळे विरूध्द निरंक**
**(मार्फत – ॲड. ए. बी. बांगर, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे मच्छिंद्र पि. नामदेव खंडागळे हे / हया दिनांक २०/०५/२०२५ रोजी महात्मा गांधी मिशन, छत्रपती संभाजीनगर ता. जि. संभाजीनगर येथे झाले/झाल्या आहेत, अर्जदार क्र.१ सुवर्णा मच्छिंद्र खंडागळे, वय – ३८ वर्षे, धंदा – घरकाम, रा. किनगाव, ता. गेवराई, जि.बीड २. आदित्य पि. मच्छिंद्र खंडागळे, वय – १६ वर्षे, धंदा – शिक्षण, अ. पा. क. आई अर्जदार नं. १ सुवर्णा मछिंद्र खंडागळे, रा. सदर, ३ . निलाबाई भ्र. नामदेव खंडागळे, वय – ६७ वर्षे, धंदा – शेती व घरकाम,रा.किनगाव,ता. गेवराई, जि. बीड ४.नामदेव काशीनाथ खंडागळे, वय – ७४वर्षे, धंदा – शेती, रा. किनगाव, ता. गेवराई, जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व यांना सदर मयत मच्छिंद्र पि. नामदेव खंडागळे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ११/०८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १६/०९/२०२५

स्वाक्षरित/–
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/–
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१५६ दि.०४.०७.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **देविदास लड्डु चव्हाण, रा.वडीकाळ्या तांडा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा/मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | विराट देविदास चव्हाण | मुलगा | १६/०७/२०१९ |
| २ | अक्षरा देविदास चव्हाण | मुलगी | ०४/०८/२०१६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २१/ ०७ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–२४७ दि.११.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमती अलका रामराव नाझरकर रा.धाकलगांव ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वतः**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अलका रामराव नाझरकर | स्वतः | ०७/०८/१९६९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– ११/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–२४८ दि.११.०८.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान अनिल सुदाम चव्हाण रा.मसई तांडा–१ ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सावन अनिल चव्हाण | मुलगा | १६/०६/२०१० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– ११/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि–१०६ दि.२८.०७.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **विजय घुमसिंग चव्हाण रा.वडीकाळया, ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | पृथ्वीराज विजय चव्हाण | मुलगा | १७/०१/२०१४ |
| २ | अस्मिता विजय चव्हाण | मुलगी | ०९/०७/२००९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक– २८/ ०७ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/–**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

पान १ वरून...

**लोकशाहीच्या संरक्षणा साठी ...**

आले आणि ताब्यातही घेण्यातआले.

तरीही त्या मागे हटल्या नाहीत.मत चोरीच्या विरोधात मोठे आंदोलन केले गेले.मतमोजणीत पारदर्शकता,एतच् + ततझ–ढ ची अनिवार्य पडताळणी आणि मतदार याद्यांतील फेरफार थांबवण्याच्या मागण्यांसाठी आंदोलन करण्यात आले.यावेळी खासदार सौ.रजनीताई पाटील आक्रमक झाल्या.ही लढाई राजकीय नाही ही लढाई लोकशाही, संविधान आणि 'एक व्यक्ती,एक मत' या अधिकाराच्या संरक्षणाची आहे ही भूमिका घेतली. लोकशाहीची होत असलेली मुस्कटदाबी विरोधात मोर्चा आक्रमक झाला.खा. सौ.रजनीताई पाटील यांनी पुढाकार घेतला.

**धारूर तालुक्यातील ...**

वाढ झाली आहे .पोलिसांना या चोरट्यांचा मात्र माघ सापडेना . यासंदर्भात नागरिकांनी अनेक वेळा धारूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे तक्रार करूनही स्थानिक बिटमलदार व अन्य पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्यामुळे चोरीचे प्रमाण घटन्या ऐवजी यामध्ये अधिकाधिक वाढत होत चाललेली आहे .पोलिसांना चोरट्यांचा तपास होत नसल्यामुळे चोऱ्यांचे आणखी प्रमाण वाढत जात असून आणखी मोठ्या चोरी होण्याची शक्यता नाकरता येत नाही . पोलीसांचा कसल्याही प्रकारे वचक राहीला नाही .पोलीस अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केल्यास आणखी प्रमाणात वाढ होण्याची शक्यता नाकरता येत नाही .प्रकाराकडे वरिष्ठ अधिकारी लक्ष देण्याची गरज आहे .तालुक्यातील सोनीमोहा येथे मागील गत महिन्यात विद्युत पंप , ट्रॉलीचे टायर, थेटेगव्हान येथे ट्रॅक्टरचे टायर, सोनीमोहा येथे घरफोडी , शेळ्यांची चोरी तसेच अन्य चोरांचे प्रमाण वाढले आहे

**कृषी निविष्ठा धारकांच्या .....**

खताची ओरड होऊ नये यासाठी संचालक निविष्ठा व गुण नियंत्रण आयुक्तालय पुणे यांच्या आदेशाने अंबड कृषी तालुका अधिकारी बाळासाहेब गंडे, यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाचे शिस्तप्रिय, कर्तव्यदक्ष म्हणून ओळखले जाणारे गुणवत्ता नियंत्रक गणेश वाघ, यांनी प्रत्येक कृषी निविष्ठधारकांच्या दुकानातील इपॉस मशीन मधील साठा व दुकानातील प्रत्यक्ष साठा, खत आवक जावक रजिस्टर, खताची बिले, खताचे ओ फॉर्म, भाव फलक, यांची कडक तपासणी करून तफावत आढळून आलेल्या कृषी निविष्ठा धारकांना नोटिसा बजावल्या असून सात दिवसाच्या आत उत्तरे सादर करण्यासाठी सांगितले आहे. सात दिवसाच्या आत उत्तरे दिली नाहीत तर त्यांच्यावर कार्यवाही केली जाईल.

**देवगाव शिवारात सुशेना ....**

दि.१२ ऑगस्ट रोजी लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

केज तालुक्यातील देवगाव शिवारात मोहर प्रभाकर नागरगोजे यांनी केंद्र शासनाच्या कृषी भंडारण योजने अंतर्गत सन २०१०–११ मध्ये शेत सर्वे नं.२२१/ अ मध्ये तीनलक्ष मेट्रिक टन साठवण क्षमतेच्या सुशेना नावाच्या कृषी गोदामाची उभारणी केली होती.गेल्या आठवडाभरात झालेल्या संततधार पावसामुळे या गोदामाची १०० फुट लांबीची पाठभिंत पडली आहे.या भिंती लगत असलेली तर इतर भिंतीही कमकुवत झाल्या असुन या ठिकाणी असलेल्या कार्यालयाच्या भिंती देखील पडलेल्या आहेत सदरील इमारत क्षतिग्रस्त झाली असून त्यांचे दहा ते पंधरा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे.त्यामुळे सदरील इमारतीच्या पुर्नबांधणीसाठी जवळपास पंधरा ते वीस लाख खर्च अपेक्षीत आहे.या कृषी गोदामाच्या झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून शासना कडून योग्य ती मदत मिळवून द्यावी,अशी मागणी मोहर प्रभाकर नागरगोजे यांनी दि.१२ ऑगस्ट मंगळवार रोजी केज तहसीलकार्यालया कडे लेखी निवेदनाव्दारे करुन या निवेदनाच्या इतर प्रति विवीध ठिकाणी पाठवल्या आहेत.

**नागनाथ देवस्थान मानूर ...**

त्याचबरोबर सर्व तरुण वर्ग या यात्रेमध्ये सामील झाला होता. या यात्रेतील विशेष बाब म्हणजे गावातील नागेश जायभाय, वैजनाथ सोलनकर, उमेश घोडके, जालिंदर कदम, या चार तरुण युवकांनी श्री क्षेत्र काशी विश्वनाथ बनारस मध्य प्रदेश येथून पायी कावड घेऊन आले होते त्यांचा प्रवास १३५० किलोमीटर झाला आणि त्यांना पाहण्यासाठी सर्व लोक गोळा झाले होते. सालाबाद प्रमाणे होणारे यात्रेस विविध वाद्य वादन, लेझीम नृत्य संपन्न झाले. या वाद्यांच्या भक्तिमय आवाजाने परिसर दुमदुमून निघाला. दुपारी २.०० वाजता कावडीच्या पाण्याने नागदेवतेचा जलाभिषेक संपन्न झाला. त्यानंतर पंचक्रोशीत यात्रेत उत्साह वाढला. ही यात्रा उत्तमरीत्या पार पाडण्यासाठी पोलिस ठाणे उपनिरीक्षक

पान १ वरून...

प्रविण जाधव व बीट अंमलदार रविंद्र नागरगोजे व सर्व पोलिस कर्मचारी यांचे सहकार्य लाभले. या यात्रेस भेट देण्यासाठी आष्टी /पाटोदा/ शिरूर चे आमदार मा. सुरेश (आण्णा) धस, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे मेहबूब भाई शेख, ज्येष्ठ पत्रकार तथा दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानूरकर साहेब, मराठी पत्रकार संघाचे वैभव स्वामी, अहिल्यानगर जिल्हा परिषद सदस्य गहिनीनाथ दादा शिरसाट , शिरूरचे तहसीलदार सुरेश घोळवे, नायब तहसीलदार विजय इंगळे, तसेच मानूर गावचे सरपंच अशोक मामा पाखरे, उपसरपंच मोहब्बतखान पठाण, अहिल्यानगर येथील उद्योगपती लिंबाजी शेठ नागरगोजे, माजी जिल्हा परिषद सदस्य दशरथरावजी वनवे दादा, रामदास बडे, पंचक्रोशीतील सर्व राजकीय मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अनेक मान्यवरांनी या यात्रेमध्ये येऊन सद्गुरु नागनाथ महाराज यांचे दर्शन घेतले व आशीर्वाद प्राप्त केले. यावेळी मानूर ग्रामपंचायतचे सरपंच अशोक मामा पाखरे यांनी गावचा नावलौकिक वाढवलेल्या उत्कृष्ट कार्य केलेल्या गावातील व्यक्तींचा सन्मान करत त्यांना शुभेच्छा दिल्या.

मानूर येथील मुस्लिम समाजाचे सामाजिक कार्यकर्ते खलंदर पठाण व सहकाऱ्यांच्या वतीने पालखीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. देवस्थानाच्या यात्रेमध्ये हिंदू मुस्लिम ऐक्याचे काही दृश्य पाहण्यात आले. १८ पगड जातीला घेऊन चालणाऱ्या नागनाथ देवस्थानाच्या कावड यात्रेस अठरापगड जाती धर्मातील सर्व समाज एकत्र येतात व नागनाथ महाराजांचे दर्शन घेतात विशेष करून मुस्लिम समाज ही तितक्याच उत्साहाने या यात्रेमध्ये सहभागी होतो.

**जालन्यात शेतकऱ्यावर...**

मिळेल की नाही, या चिंतेत ते आहेत. साळेगाव शिवारात गट नंबर १८५ मध्ये विठ्ठल बुटरे यांची दोन हेक्टर दोन आर जमीन आहे. अल्पभूधारक असूनही शेतीत कष्ट करून ते आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत. मात्र, गेल्या तीन वर्षांपासून गावातील काही मंडळींनी राजकीय दबावामुळे त्यांचा शेतात जाण्याचा जुना रस्ता बंद केला आहे. त्यामुळे त्यांची शेती पडीक पडली असून, त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे.या प्रकरणी तहसीलदारांनी जुना रस्ता बंद करून त्यांना ओढ्यातून नवीन रस्ता दिला. परंतु, या नव्या रस्त्यामुळे शेतात जाणे शक्य नाही. प्रशासनाने कोणतीही पाहणी न करता आणि स्थानिक दबावाला बळी पडून हा अन्याय केल्याचा आरोप विठ्ठल बुटरे यांनी केला आहे. गेल्या दोन आठवड्यांपासून ते न्याय मिळवण्याच्या आशेने उपोषण करत आहेत. आता १५ ऑगस्टला स्वातंत्र्याचा उत्सव साजरा होत असताना, एका शेतकऱ्याला आपल्याच शेतात जाण्याच्या स्वातंत्र्यासाठी जीव गमवावा लागणार का, असा संतप्त सवाल यानिमित्ताने उपस्थित होत आहे.प्रशासनाने तातडीने या प्रकरणाकडे लक्ष देऊन विठ्ठल बुटरे यांना न्याय द्यावा, अशी मागणी परिसरातील शेतकरी आणि सामाजिक कार्यकर्ते करत आहेत.

**शहरातील विविध....**

बीड शहरातील अनेक नागरी प्रश्न प्रलंबित आहेत. याबाबत आ.संदीप क्षीरसागर सातत्याने शासन, प्रशासन स्तरावर पाठपुरावा करत आहेत. या अनुषंगाने बीड नगरपरिषदेच्या स्तरावरील विविध प्रलंबित विषयांवर आढावा घेण्यासाठी बीड नगरपरिषदेचे नवीन मुख्याधिकारी शैलेश फडसे आणि प्रशासनातील अधिकारी यांच्यासमवेत आ.संदीप क्षीरसागर यांनी बैठक घेऊन, सविस्तर चर्चा करून आढावा घेतला. तसेच बीड शहरातील नागरिकांसाठी महत्वाचे असलेले विविध प्रश्न प्रशासकीय स्तरावरून तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी मुख्याधिकारी आणि नगरपरिषद प्रशासनाला केल्या आहेत. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, बीड नगरपरिषदेतील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शहरातील प्रलंबित ठेवलेले प्रमुख रस्ते ना.अजितदादांच्या पुढाकारातून लवकरच होणार

बीड शहरातील प्रमुख असलेले छत्रपती शिवाजी महाराज चौक–राजूरी वेस–बलभीम चौक–धोंडीपुरा–सुभाष रोड, राजूरीवेस–बुंदेलपुरा–कटकटपुरा–सुभाष रोड, कारंजा–पिंगळे गल्ली–बुंदेलपुरा, नगर नाका ते पालवण चौक, राजू नगर ते अंकुश नगर या प्रमुख रस्त्यांच्या कामाला ना.अजित दादा पवार यांच्या पुढाकारातून लवकरच प्रत्यक्षात सुरूवात होणार आहे. दरम्यान हे सर्व रस्ते ३ वर्षांपूर्वीच मंजूर झालेले आहेत. परंतु तात्कालीन पालकमंत्री यांनी जाणीवपूर्वक, श्रेयवादातून बीड शहरातील रस्त्यांचे काम प्रलंबित ठेवण्याचे नियोजन केले होते. परंतु ना.अजित दादा पवार यांनी बीड शहराचा जिव्हाळ्याचा प्रश्न लक्षात घेता तातडीने हे रस्ते करण्याच्या सूचना दिल्या असून लवकरच या रस्त्यांच्या कामाला प्रत्यक्षात सुरूवात होणार आहे.

# चकलांब्यात वाळू तस्करांना पुन्हा दणका, ३० लाखांचा मुद्देमाल जप्त




चकलांबा ।प्रतिनिधी

पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी अवैध धंद्यांवर कठोर कारवाईच्या दिलेल्या आदेशानुसार चकलांब्यामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी पुन्हा वाळू तस्करांवर कारवाई केली आहे. गोदापात्रात केलेल्या या कारवाईत ३० लाख १८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी चकलांबा-पोलीस ठाण्यात बाळू पवार रा. गुळज व एक अद्यात अश्या ०२ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी मागच्या काही दिवसांत वाळू तस्करांवर मोठ्या कारवाया केल्या आहेत. मंगळवारी देखील (दि.१२/०८/२५) रोजी देखील पंचांळेश्वर येथे नदी पात्रात दोन ट्रॅक्टर चोरटी वाळू वाहतूक करीत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.त्यानुसार पाटील यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सूचना करत कारवायाचे आदेश दिले.त्यानुसार पोलिसांनी छापा मारला असता यावेळी वाळू तस्करी करणारे दोन टॅक्टर आले.त्यानुसार दोन्ही वाहने ठाण्यात आणण्यात आली असून या कारवाईत ११ लाख रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत काँवत,अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर,पोलीस उपअधीक्षक श्री.राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील,–ीळ चांदमारे, पोशी / हनुमान इंगोले,पोशी / सुरेश सुरवसे,पोशी/२३१ प्रशांत कल्याण घोंगडे आदींनी केली आहे.



बीड – अखिल भारतीय बंजारा क्रांती दल राष्ट्रीय महासचिव, भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष, शरद भाऊ राठोड यांनी मुंबई मंत्रालय येथे बंजारा समाजाचे राष्ट्रीय नेतृत्व तथा राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री ना. श्री संजयभाऊ राठोड साहेब यांची भेट घेतली.यावेळी विविध विकास कामाचे निवेदन दिले.याप्रसंगी अखिल भारतीय बंजारा क्रांती दल युवा आघाडी प्रदेशाध्यक्ष भूषण भाऊ पवार, युवा नेते अजित चव्हाण, सरपंच अनिल राठोड, अजय राठोडसह मान्यवर उपस्थित होते.

# मानसिक आरोग्यासाठी पालक आणि मुलींमधील मोकळा संवाद गरजेचा– जिल्हा समन्वयक संतोष हरणमारे

बीड ।प्रतिनिधी

वयात येणे ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. या काळात मुलींना योग्य माहिती, भावनिक आधार आणि सुरक्षित वातावरण मिळाले, तर त्या आत्मविश्वासाने आणि सक्षमतेने जीवनातील प्रत्येक टप्पा पार करू शकतात. मासिक पाळीतील स्वच्छता महत्वाची आहे. सॅनिटरी पॅडचा योग्य वापर करणे, आणि तो वेळोवेळी बदलणे गरजेचा आहे. मानसिक आरोग्यासाठी पालक आणि मुलींमधील मोकळा संवाद अत्यंत गरजेचा असल्याचे प्रतिपादन जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा समन्वयक संतोष हरणमारे यांनी केले.

ते जिल्हा रुग्णालय आणि माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने तळेगाव येथील माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल येथे मंगळवारी आयोजित कळी उमलताना या राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. यावेळी जिल्हा रुग्णालयाच्या ऑडिओ लॉजिस्ट अंजली कुटे यांच्यासह इंटरनॅशनल स्कूलचे डायरेक्टर ज्ञानेश्वर



तांबे, नम्रता तांबे, मुख्याध्यापिका–सारिका जगताप पालक, किशोरवयीन विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना जोगदंड यांनी केले.

मुलींनी जंक फूड टाळावे– अंजली कुटे

जिल्हा रूग्णालय, बीड येथील ऑडिओ लॉजिस्ट अंजली कुटे यांनी त्वचा व केसांची काळजी, जंक फूड टाळणे, सकारात्मक विचारसरणी आणि आत्मविश्वास वाढवण्याच्या टिप्स मुलींना दिल्या.

# तलवाडा पोलीस स्टेशन मध्ये गणेश उत्सव, ईद ए मिलाद निमित्त शांतता समितीची बैठक संपन्न

## उत्सवा दरम्यान कोणीही गैरप्रकार करू नये कोणाचीही गय केली जाणार नाही कायदेशीर कारवाई करणार : सपोनि मनोज निलंगेकर

तलवाडा प्रतिनिधी

आगामी सणा निमित्ताने गणेश उत्सव व ईद ए मिलाद या निमित्ताने दर वर्षी प्रमाणे याही वर्षी तलवाडा पोलीस स्टेशन येथे दिं.१२ रोजी संध्याकाळी शांतता समितीच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी सपोनि मनोज निलंगेकर म्हणाले की दहा दिवस गणेशोत्सव आनंदाने साजरा करावा जेणेकरून गणेश उत्सव समितीच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या पासुन दुसऱ्यांना त्रास होईल असे वागु नये गणेश उत्सवा दरम्यान सास्कृतीक कार्यक्रम घेण्यात यावे विविध सामाजिक देखावे सादर केले पाहिजे देखावे सादर करत असताना आसा कोणताही देखावा सादर करु नये जेने करुन दुसऱ्या समाजाला त्याचा त्रास होईल असे देखावे करू नये ईद ए मिलाद व गणेश उत्सव सण सर्व समाज बांधवांनी एकत्र येऊन एकजुटीने साजरे करायला पाहिजे गावामध्ये व गावातील नागरिकांमध्ये भाई चार कायम राहीला पाहिजे असे सर्व गावातील गावकरी मंडळींनी प्रयत्न केले पाहिजे डिजे डीजे वाजु नये असे मत या बैठकीत सपोनि मनोज निलंगेकर यांनी मांडले त्यांनी गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांच्या अडचणी जाणुन घेऊन त्यांना काही सुचना हि केल्या त्या सुचनांचे जे गणेश मंडळ उल्लंघन करेल त्या मंडळावर सुध्दा कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची हि नोंद गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी घ्यावी



असेही त्यांनी इशारा दिला आहे.यावेळी माजी जि,प, सदस्य अॅड सुरेश हात्ते,माजी पंचायत समिती सदस्य शाम कुंड माजी जि,प, सदस्य युवराज डोंगरे माजी सरपंच विष्णू हात्ते,माजी उपसरपंच अक्रम सौदागर ,नजीर कुरेशी, मोलाना जाकेर सिद्दिकी,शेख अफसर, दादाराव रोकडे, गोपाल चव्हाण, धोंडिबा हातागळे, विनोद हातागळे,पत्रकार बांधव, गावातील सर्वच गणेश मंडळाचे पदाधिकारी,व गावातील नागरिक व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते शांतता समितीचे बैठकीचे आभार उपनिरीक्षक कैलास अन्नादास यांनी मानले

# आजच्या तिरंगा रॅली मध्ये सर्व बीड शहरातील जनतेने सहभाग नोंदवावा – अशोक लोढा

बीड ।प्रतिनिधी

भारतीय स्वातंत्र्यदिन आणि पहलगाम हल्ल्याचा बदला घेऊन भारतीय लष्कराने पाकिस्तानी आतंकवाद्यांच्या विरोधात ऑपरेशन सिंदूर अभियान राबवून आतंकवाद्यांच्या भ्याड हल्ल्याचा सामना केला व त्यांचा समूळ नायनाट करण्याचे काम भारतीय सैनिकांनी केले आहे. आतंकवादयांचे मनसुबे उध्वस्त करत त्यांच्या मुस्क्या आवळणाऱ्या आपल्या शूरवीर भारतीय जवानांच्या गौरवार्थ त्यांना मानाचा मुजरा आणि नतमस्तक होऊन त्यांनी केलेल्या कामगिरीचे कौतुक आणि अभिनंदन म्हणून स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत बीड शहरांमध्ये तिरंगा रॅलीचे आज आयोजन करण्यात आले आहे. या रॅलीत देश प्रेमी नागरिकांनी मोठ्या



संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन भाजप नेते अशोक लोढा यांनी केले आहे.

आपल्या राष्ट्राच्या कल्याणासाठी राष्ट्रप्रेमाचा संकल्प पुन्हा एकदा दृढ करूया. देशाचा विकास, सुरक्षा व देशवासीयांच्या कल्याणासाठी नेहमी समर्पित राहण्याची प्रतिज्ञा घेऊया. मागील इतिहास पाहता स्वतःच्या प्राणाची चिंता न करता देशासाठी प्राणाचे बलिदान देण्यास कधीही तयार असतात. अशा या सैनिकांच्या सन्मानार्थ आजच्या रॅलीमध्ये सर्व पदाधिकारी, सर्वसामान्य नागरिकांनी सहभागी व्हावे. ही रॅली सकाळी ९:३० वा. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळ्यापासून – सुभाष रोड – साठे चौक ते छ.शिवाजी महाराज यांचे पुतळ्यापर्यंत असणार आहे. या रॅलीच्या माध्यमातून राष्ट्रभक्ती आणि राष्ट्रोद्धाराची चेतना जागृत करत भारतीय स्वातंत्र्याच्या महायज्ञात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत या रॅलीमध्ये सहभागी होऊन देशभक्ती व राष्ट्रभक्तीची चेतना जागृत करावी असे आवाहन अशोक लोढा यांनी केले आहे.

### सौ.के.एस.के.महाविद्यालयातील पदव्युत्तर विषयांना विद्यापीठाची

# मान्यता व प्रवेश प्रक्रिया सुरु

बीड ।प्रतिनिधी

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,बीडच्या पदव्युत्तर विभागातील पुढील विषयांना प्रवेशाची मान्यता दिली आहे. यात सूक्ष्मजीवशास्त्र, संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, गणित, गृहशास्त्र, भूगोल, इंग्रजी, मराठी, हिंदी, संगीत,राज्यशास्त्र, एम.कॉम. या सर्व पदव्युत्तर विषयांना विद्यापीठातील त्रीसदस्यीय समितीने पहाणी करून महाविद्यालयातील पायाभूत सुविधा व शैक्षणिक गुणवत्तेचा आढावा घेऊन अहवाल सादर केला त्या नंतर पदव्युत्तर विभागांना प्रवेशासाठी परवानगी दिली आहे.तज्ञ प्राध्यापक,सुसज्य ग्रंथालय,मुलींचे वसतीगृह,अद्यावत प्रयोगशाळा,सर्व संगणीकीयकरण, क्रिडांगण अशा सर्व सुविधानीयुक्त अशा महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा असे आवाहन नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री.किशोर काळे, उपाध्यक्ष डॉ.भारतभूषण क्षीरसागर,संस्थेचे सचिव डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर,सहसचिव डॉ.दीपा क्षीरसागर, पूजा भारतभूषण क्षीरसागर, डॉ.सारिका क्षीरसागर प्रशासकीय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.व्ही.क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर पदवी विभागाचे संचालक डॉ.खान ए.एस.,कमवि उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे,पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर सदरील विषयांना तात्काळ प्रवेश घ्यावा असे आवाहन केले आहे.

# सौ.के.एस.के.महाविद्यालयात एस.आर.रंगणनाथन यांची जयंती साजरी

बीड ।प्रतिनिधी

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात भारतीय ग्रंथालय शास्त्राचे पितामह डॉ.एस.आर. रंगनाथन यांची जयंती साजरी करण्यात आली.या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर यांच्या सहस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले.महाविद्यालयाचे ग्रंथालय हे समृध्द व दुर्मिळ सोयी सुविधानी अद्यावत असे आहे. विद्यार्थी व प्राध्यापकांना संशोधन कार्यासाठी सर्व विषयाचे समृध्द दुर्मिळ ग्रंथ





उपलब्ध असून त्याचा लाभ संशोधक विद्यार्थ्यांनी घेतला पाहिजे असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल प्रा.जगन्नाथ पटाईत यांनी केले कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर,डॉ.ए.एस.खान महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे आभार अंगत दराडे यांनी केले. यावेळी ग्रंथालयातील सर्व कर्मचारी उपस्थित होते.

# श्री गणेशोत्सवानिमित्त कंकालेश्वर मंदिर येथील विसर्जन विहीरीतील गाळ काढून मिरवणूक मार्ग दुरुस्त करावा- ॲड.सुधीर जाधव

बीड ।प्रतिनिधी

**सध्या पवित्र श्रावण महिना सुरु असून याच काळापासून मोठ्या प्रमाणावर सण उत्सवाला सुरुवात होत असते. लोकमान्य बाळगंगाधर टिळक यांनी सुरु केलेला श्री गणेशोत्सव देखील अवघ्या काही दिवसांवर आला असून श्री गणेश भक्तांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे. श्री कंकालेश्वर मंदिर परिसरातील विहीरीमध्ये बीड शहरातील भाविकभक्त व सार्वजनिक मंडळाचे श्री गणेशाचे विसर्जन केले जाते.** परंतु येथील विहिरीत मोठ्या प्रमाणावर गाळ साचलेला असून हा गाळ नगर पालिका प्रशासनाने तात्काळ काढून विहीर व परिसर स्वच्छ करुन मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजवावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते ॲड.सुधिर जाधव यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे केली आहे.

बीड शहरात मोठ्या उत्साहात श्री गणेशोत्सव साजरा केला जातो. गणेशोत्सव



काळात शहरात आनंदाचे आणि भक्तीभावाचे वातावरण असते. दहा दिवसानंतर श्री गणेशाचे विसर्जन करण्याची परंपरा पूर्वीपासून सुरु आहे. अनंत चतुर्दशीच्या दिवशी गणेशाचे विसर्जन केले जाते. बीड शहरातील श्री कंकालेश्वर मंदिर परिसरातील विहिरीत सध्या मोठया प्रमाणावर गाळ साचलेला असून हा गाळ नगर पालिका प्रशासनाने काढून सदरील विहीर स्वच्छ पाण्याने पूर्णपणे भरण्यात यावी तसेच मंदिर परिसर स्वच्छ करावा, तसेच विसर्जनाच्या दिवशी या परिसरात लाईट व फोकसची व्यवस्था करण्यात यावी जेणे करुन भाविकांना त्रास होणार नाही. तसेच बीड शहरातील विविध सार्वजनिक मंडळे मोठ्या उत्साहात मिरवणूक काढतात. सध्या बीड शहरातील मिरवणूक मार्गावर मोठ्या प्रमाणावर रस्त्यावर खड्डे झाले असून सदरील खड्डे हे तात्काळ बुझवून रस्ता दुरुस्त करण्यात यावा अशी मागणीही पत्रकात सामाजिक कार्यकर्ते ॲड.सुधिर जाधव यांनी केली आहे.

# श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त इस्कॉन बीडतर्फे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन



बीड ।प्रतिनिधी

श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त श्री. श्री. राधा गोविंद मंदिर ( इस्कॉन) संत सावता माळी चौक बीड येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. दि.१५ ऑगस्ट २०२५ शुक्रवार रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी पूर्व संध्या महोत्सव सायं .४:३० ते रात्री १०:०० पर्यंत भजन, कीर्तन, प्रवचन, अभिषेक, आदिवास, सांस्कृतिक कार्यक्रम, व महाप्रसादाचे आयोजन केलेले आहे.

दि.१६ ऑगस्ट २०२५ शनिवार रोजी श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव सायं.४=३० ते रात्री १:०० पर्यंत भजन, श्रीकृष्ण कथा, महा अभिषेक, ५६ भोग, सांस्कृतिक कार्यक्रम, महाआरती, चे आयोजन केलेले आहे दि.१७ ऑगस्ट २०२५ रविवार रोजी श्री प्रभुपाद अविर्भाव दिवस सकाळी ९:३० ते दुपारी १२:३० पर्यंत भजन, प्रवचन, पुष्पा अभिषेक, आणि दुपारी १:०० ते ३:०० पर्यंत महाप्रसादाचे आयोजन केलेले आहे. तरी समस्त बीड येथील सर्व भाविक भक्तांनी या अध्यात्मिक कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे इस्कॉन बीडचे प्रसिद्धी प्रमुख राम सोन्नर (राधिका जीवनदास) यांनी कळवले आहे.

# दावरवाडी येथे राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची २३० वी पुण्यतिथी साजरी

दावरवाडी ।प्रतिनिधी

दावरवाडी येथील अहिल्यादेवी होळकर चौकातील पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची (२३० वी.) पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदना करण्यात आली. यावेळी गावातील सर्व धनगर समाज बांधव व इतर नागरिकांची उपस्थिती होती.पुण्यतिथी स्थळी पवन तांगडे, कीशोर खोलासे, शिवनाथ हाके, पत्रकार भगवान सोरमारे, मिठू चोरमले, शेखर धारे, आसमान धारे,गणेश सोरमारे, साहेबराव धारे, अनिल काकडे, पांडुरंग वाघमोडे, बाळु सरोदे सह गावातील नागरिक यांची उपस्थिती होती.



# धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात जननी शिशु सुरक्षा योजने अंतर्गत सोनोग्राफी तपासणी सुरु

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबातील गरोदर महिलांची वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यानंतर पुढील उपचाराच्या निदानासाठी सोनोग्राफीचा सल्ला दिला जातो. तरी या आधी पण गरोदर मातांची सोनोग्राफी तपासणीसाठी रुग्णालयाच्या वतीने एक पावती देऊन गरोदर मातांची मोफत तपासणी केली जात होती.तरी आता रुग्णालयातच सोनोग्राफीची मशीन सुरू केली असल्याने रुग्णांना सोनोग्राफी करुन मिळणार आहे. आता गरोदर मातांना



तपासणी साठी ग्रामीण रुग्णालयातुन बाहेर जाण्याची गरज लागणार नाही.असे वैद्यकीय अधीक्षक डॉ. वेणुगोपाल पंडित यांनी रुग्णालयातील सोनोग्राफी मशीन चालू केली. आज दी.१३ ऑगस्ट रोजी वसिमा बेगम शेख वाजीद, अंजली शरदमुणी लोखंडे, श्रीजीता गणेश कन्नमवार या ३गरोदर मातांची रेडिओलॉजिस्ट तज्ञ डॉ. प्रियंका येलदारकर मॅडम यांनी तपासणी करून रुग्णांना रिपोर्ट देण्यात आले, तरी आज पासून दर शुक्रवारी गरोदर महिलांची जननी शिशु सुरक्षा योजने अंतर्गत तपासणी केली जाणार आहे. धर्माबाद ग्रामीण रुग्णालयात प्राप्त सोनोग्राफी मशीन कार्यान्वित करण्यात आली असून दर शुक्रवारी १०.३० पासुन रेडिओलॉजिस्ट उपस्थित असणार आहेत.– डॉ वेणुगोपाल पंडित, वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय धर्माबाद.

# विविध सामाजिक उपक्रमाने शिवराज पवारांचा वाढदिवस साजरा

## रुग्णांना फळ वाटप, शालेय साहित्यांचे वाटप, छत्रीचे वाटप करण्यात आले




गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरातील पवार कुटुंबातील युवक नेतृत्व शिवराज बाळराजे पवार यांचा वाढदिवसा निमित्त उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना फळ वाटप तसेच शालेय साहित्यांचे वाटप व पावसाळ्याची गरज लक्षात घेऊन शहरातील महिलांना छत्रीचे वाटप करून शिवराज पवार यांचा धुमधडाक्यात वाढदिवस साजरा करण्यात आला.

दि.१३ ऑगस्ट रोजी शहरातील पाटील घराण्यातील युवक नेते शिवराज पवार यांचा वाढदिवसा निमित्त शहरातील साठेनगर येथील जायकवाडी जि.प.मा.शाळा येथे शेख राजु यांच्या वतिने शालेय साहित्यांचे वाटप करण्यात आले. तर उपजिल्हा रुग्णालयात विशाल पवार यांच्या वतिने फळे वाटप करण्यात आले. करण जाधव यांच्याकडून शहरातील महिलांना छत्रीचे वाटप करण्यात आले. यावेळी महिला आघाडी अध्यक्ष रत्नमालाताई मोटे,मा.नगराध्यक्ष ब्रम्हदेव धुरंधरे कानगुडे आप्पा, मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी,मधुकर वादे,भगवान घुबार्डे, याहीया खॉन, प्रमोद मोटे,गणेश मोटे, पत्रकार सुभाष सुतार, सुशील टकले ,सय्यद आय्युबभाई, मा.नगरसेवक राम पवार, संजय इगळे, मुन्नासेठ, राजेंद्र आर्दड, कृष्णा काकडे, किशोर धोडलकर, जुनेद बागवान, भरत गायकवाड, महेश सौंदरमल, फाद चाऊस, विठ्ठल मोटे, दत्तात्रय जाधव, प्रदीप ननवरे, गोरख मोटे,योगेश मोटे,ऋषिकेश मोटे, बाबा वाघमारे, शौहेब आत्तार, लक्ष्मण चव्हाण, प्रकाश उपळकर, बाळासाहेब गायकवाड, सतिष पवार, भैय्या पवार,वाजेद पठाण, बाबा खरात, कृष्णा पाटोळे, सुदंर काकडे, कट्टुभाई फिटर, आकाश खाजेकर, सादेक चाचु,सय्यद माजेद, राणा कानाडे,शेख दस्तगिर,शेख रेहान, मगन परदेशी,शेख बाबा,सालम चाऊस, रणजीत कांबळे, बाळासाहेब उबाळे, पिटु साळवे. पिटु पानखडे, शिवाजी काळे, भाऊसाहेब बेद्रे,मुरली सुतार, विलास शिदे, पप्पुशेठ भोसले, विष्णु शेलार, मुन्ना मोटे, गणेश पवार, श्रीराम घाटुळ, बबन जाधव,दाऊद पठाण, शौकत पठाण आदि सह पदाधिकाऱ्यांसह नागरिक व महिला मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# विहामांडवा येथे अहिल्यादेवी होळकर व संत भगवान बाबा पुण्यतिथी जयंती साजरी



पैठण ।प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील विहामांडवा येथे सरस्वती ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालयामध्ये महान संत भगवान बाबा यांची जयंती व राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची (२३०) वी. पुण्यतिथी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्रथम राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व भगवान बाबा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पुण्यतिथी व जयंती मोठ्या उत्साहाने सर्व समाज बांधव व भगवान बाबा भक्तगण यांची यावेळी उपस्थिती दर्शवली होती. यावेळी गावातील नागरिकांनी पुण्यतिथी स्थळी उपस्थिती लावली होती. ज्येष्ठ शिक्षक बबनराव नवपुते सर यांनी प्रस्तावना केली. व्यापारी महासंघाचे राजेंद्र पन्हाळकर यांनी विचार मांडले तर वाचनालयाचे अध्यक्ष राजेंद्र देशमाने सर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले,

यावेळेस गावातील अनेक मान्यवर उपस्थित होते त्यामध्ये व्यापारी कैलास भाऊ नवपुते, प्रकाश जोशी, मनोज वाव्हळ, सुभाष पवार, नरेंद्र हुंडीवाले, सुभाष आवारे, सुखदेव होटकर, आयाज पठाण,प्रकाश जोशी, मनोज वाव्हळ, सुभाष पवार, नरेंद्र हुंडीवाले, सुभाष आवारे, सुखदेव होटकर, आयाज पठाण, दादासाहेब रोडगे, विकास काजळे , राजू सोनटक्के, दगडू अण्णा झुंजे, रवींद्र देशमाने, हरिभाऊ हाकम, सुभाष भाऊ ताडे, दिनकरराव राजे निंबाळकर, अरुण नाना तुपकरी, तीर्थराज हाकम, दादा नवपुते, दादासाहेब हातमोडे, सतीश शिंदे हिंगणी, चंद्रकांत लंबे, बबनराव नवपुते सर, संदीप साठे, राजेंद्र गाभूड इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# योगेश्वरी पॉलिटेक्निकमध्ये विद्यार्थी स्वागत व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित कृष्णाजी पुरुषोत्तम चौसाळकर योगेश्वरी पॉलिटेक्निक या विभागामध्ये मंगळवार,दि. १२ ऑगस्ट रोजी प्रथम वर्षात नूतन प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ व त्याचबरोबर पॉलिटेक्निक अभ्यासक्रम पूर्ण करून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा पालकांसह सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा. चंद्रशेखर बर्दापूरकर तसेच प्रमुख पाहुणे म्हणून शिक्षणतज्ञ मा. महेश पाटील,सचिव श्री.कमलाकरराव चौसाळकर व प्रसिद्ध उद्योजक प्रताप पवार हे उपस्थित होते.

योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या योगेश्वरी पॉलिटेक्निक या विभागाच्या स्थापनेला शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये १४ वर्ष पूर्ण झाली आहेत. मराठवाड्यातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाची सोय व्हावी व विद्यार्थी जागतिक स्पर्धेच्या दृष्टीने तयार व्हावीत या उद्देशाने सुरू केलेल्या या विभागातून आजपर्यंत हजारो अभियंते घडले असून, यामध्ये पॉलिटेक्निकचे माजी विद्यार्थी शासकीय अधिकारी, प्रसिद्ध उद्योजक, व उद्योग समूहांमध्ये कुशल अभियंते म्हणून कार्यरत आहेत. योगेश्वरी शिक्षण संस्थेची उज्वल परंपरा योगेश्वरी पॉलिटेक्निक चालवत असून, अल्पावधीतच या विभागाने महाराष्ट्रातील सर्वोत्कृष्ट तंत्रनिकेतनच्या यादीत आपले नाव समाविष्ट केले आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना पॉलिटेक्निकचे प्राचार्य रमण देशपांडे यांनी पॉलिटेक्निकमधील सोयीसुविधा, अभियांत्रिकीच्या विविध शाखा, व्यक्तिमत्त्व विकास, संगणकीय सुविधा विविध अभ्यासक्रम, पदविका अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतरच्या करिअर संधी, यशस्वी विद्यार्थ्यांशी संवाद या मुद्द्यांबाबत माहिती दिली. यानंतर प्रमुख पाहुणे मा. महेश पाटील यांनी मनोगत व्यक्त करत असताना, योगेश्वरी शिक्षण संस्था ही तळागाळातल्या विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असून, विद्यार्थ्यांनी आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे असा संदेश दिला. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करत असताना चंद्रशेखर बर्दापूरकर यांनी योगेश्वरी पॉलिटेक्निक मध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार तंत्रशिक्षण देण्याच्या उद्देशाने आवश्यक असणारी सर्वतोपरी मदत योगेश्वरी शिक्षण संस्थेतर्फे करण्यात येणार असून, भविष्यात देखील गुणवंत विद्यार्थ्यांनी तंत्रशिक्षणात संस्थेचे नाव उज्वल करावे अशी अपेक्षा व्यक्त केली.त्याचबरोबर उन्हाळी परीक्षा -२०२५ मध्ये प्रथम वर्षातील २० विद्यार्थ्यांनी गणित विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले आहेत. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे प्रवेश प्रक्रिया प्रमुख तसेच प्रथम वर्षाचे विभाग प्रमुख प्रा.नारायण सिरसाट यांना या उल्लेखनीय योगदानाबद्दल मान्यवरांच्या शुभहस्ते सपत्नीक सत्कारित व सन्मानित करण्यात आले.विद्यार्थांना मार्गदर्शन करून,तंत्रनिकेतनचा नावलौकिक वाढवण्यात महत्वपूर्ण योगदान देणारे विभाग प्रमुख प्रा.रोहित कदम, प्रा. शाम गडदे,प्रा. बप्पासाहेब सोनवणे यांना याप्रसंगी मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांच्या वतीने चि.अभिषेक बिराजदार व चि ज्ञानेश्वर भांगे यांनी तंत्रनिकेतनबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन प्रा.प्रियांका गंभीरे व आभार प्रा. शाम गडदे यांनी व्यक्त केले. यावेळी मोठ्या संख्येने विदयार्थी व पालक उपस्थित होते.




# धनगर पिंपरीच्या गौरी बहुले हिने मिळवला कॉम्प्युटर सायन्ससाठी प्रवेश, गावासाठी अभिमानास्पद क्षण..!



अंबड ।प्रतिनिधी

तालुक्यातील धनगर पिंपरी येथील गौरी परमेश्वर बहुले हिने आपल्या जिद्दीच्या जोरावर एक मोठे यश संपादन केले आहे. तिला छत्रपती संभाजीनगर येथील नामांकित महाराष्ट्र इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेजमध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या पहिल्या वर्षासाठी प्रवेश मिळाला आहे. तिच्या या दैदिप्यमान यशाने तिने केवळ आपल्या कुटुंबालाच नव्हे, तर संपूर्ण गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.

अत्यंत मेहनती आणि अभ्यासू वृत्तीची गौरी सुरुवातीपासूनच हुशार विद्यार्थिनी होती. तिच्या या कठोर परिश्रमाचे फळ आज तिला मिळाले आहे. तंत्रज्ञानाच्या या युगात कॉम्प्युटर सायन्स क्षेत्रात मोठे काम करण्याचे तिचे स्वप्न आहे. गौरीच्या या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या या यशात तिचे आई-वडील आणि शिक्षकांचे मार्गदर्शनही तितकेच महत्त्वाचे आहे. तिच्या या कामगिरीमुळे गावातील इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळेल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. गौरीच्या पुढील वाटचालीस भरभरून गावकऱ्यांच्या वतीने शुभेच्छा दिल्या जात आहेत.




जिल्हा परिषद बीड, समाजकल्याण कार्यालय बीड अंतर्गत स्थानिक स्तर समिती बैठक, जिल्हाधिकारी कार्यालय बीड - बीड जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी मा. श्री. विवेक जॉन्सन साहेब, भा. प्र. से. यांच्या सोबत शासन मान्य महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटना जिल्हाध्यक्ष बीड, स्थानिक स्तर समिती सदस्य तथा बीड जिल्हा दिव्यांग मतदार नोंदणी राजदूत श्री. राजेंद्र लाड यांचे टिपलेले एक क्षणचित्र.

# संभाजी ब्रिगेडच्या बीड जिल्हाध्यक्षपदी प्रा.शशिकांत कन्हेरे यांची निवड


आष्टी (प्रतिनिधी)

संभाजी ब्रिगेडच्या बीड जिल्हाध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते, संभाजी ब्रिगेडची मुलूख मैदानी तोफ प्रा. शशिकांत कन्हेरे यांची नियुक्ती प्रदेशाध्यक्ष ड. मनोज आखरे व महासचिव सौरभ खेडेकर, प्रदेश प्रवक्ते गंगाधर बनबरे व सर्व प्रदेश कार्यकारिणीच्या उपस्थितीत त्यांना नियुक्ती पत्र पुणे येथील पंडीत जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक सभागृहात जिल्हा अध्यक्ष पदगृहन सोहळ्याच्या कार्यक्रमात फेर निवड करण्यात आली आहे. सामाजिक कार्यात सतत अग्रेसर राहणा-या प्रा. कन्हेरे यांची पुन्हा बीड जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड झाल्याने बीड जिल्ह्यात आनंद व्यक्त केला जात आहे. मराठवाडासह बीड जिल्ह्यात संभाजी ब्रिगेडचा विचार सर्वदूर पोहोचविलेला आहे. प्रा. शशिकांत कन्हेरे यांनी सामाजिक बांधिलकी मानून केलेले कार्य तसेच ते अनेक वर्षांपासून पुरोगामी चळवळीत सक्रिय आहेत. त्यांची सामाजिक व राजकीय वाटचाल या सर्व कार्याची दखल घेऊन संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ड. मनोज आखरे यांनी प्रा. शशिकांत कन्हेरे यांची पुन्हा एकदा बीड जिल्हाध्यक्षपदी फेरनिवड करून त्यांना शुभेच्छा दिल्या. दरम्यान आपल्या निवडीविषयी आभार मानून बोलताना प्रा. शशिकांत कन्हेरे यांनी सांगितले की, संभाजी ब्रिगेडचे संघटन वाढीवर भर देणार आहोत. समाजातील प्रश्न सोडविणार आहोत. तसेच सामान्य माणसांवर होणा-या अन्याय - अत्याचारा विरूद्ध लढण्यासाठी संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून २४ तास जनसेवेसाठी उपलब्ध असेल असे नवनिर्वाचित बीड जिल्हाध्यक्ष प्रा. शशिकांत कन्हेरे यांनी सांगितले. त्यांच्या या निवडीबद्दल मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड, विविध सामाजिक संघटनेच्या पदाधिकारी, कार्यकर्ते



# १४ वर्षाचा 'वाघ्या' शेकडे कुटुंबाचा जिवलग मित्र गेला

## श्वानाच्या वर्धापकाळाच्या निधनाने परिवाराची व्याकुळता



आष्टी (राजेंद्र लाड)

अगदी परिवारातील एका सदस्याप्रमाणे गेली १४ वर्षे सतत सोबत राहून मुका प्राणी असूनही माणुसकी जपणाऱ्या आणि सर्वांसोबत प्रेमाने राहणारा वाघ्या हा श्वान १४ वर्षानंतर वार्धक्याने आपल्यातून निघून गेल्यानंतर परिवाराची व्याकुळता.. आणि झालेले दु:ख विसरता न येणारे आहे!

इमानदारी आणि स्नेह खाल्लेल्या मिठाला जागणं हे सर्व शिकावं तर या प्राण्याकडून वाघ्या (पाळलेला कुत्रा) खूप आठवणीत राहशील १४ वर्ष परिवारासोबत राहिला, वृद्धापकाळाने निधन झाले. प्रत्येकजण रडत भावपूर्ण श्रद्धांजली वाहत आहे. वाघ्या दरवेळी भेटणं, लाड घालणं, रुसणं आता फक्त आठवण ......गावाकडे घरी गेल्यानंतर प्रत्येक वेळी प्रेमाने जवळ येणे जसं की, खुशाली विचारायची आहे आणि स्वत:च काही सांगायचं आहे. या भावनेने जवळ येऊन अंगाभोवती लाड घालणं हे त्याचं पाहिलं की, आपण त्याला गोंजारत पाठीवरून हात फिरवायचा आणि चल आता बस झालं...मग त्याने बाजूला जायचं आणि आपण घराकडे जर घरी कोणी नसलं तर कुठे गेलेत विचारायचं आणि मग त्याने पुढे चालायचं आपण त्याच्या मागे चालायचं. घरातील सदस्य ज्या जवळच्या रानात असतील तिथे घेऊन जाणार आणि जाताना आपल्याला काळजीपूर्वक घेऊन चालल्याचा निश्चित भास होणार जसं की ऐकलं होतं झेड सुरक्षा असते परंतु ही झेड प्लस होती. आपल्याला तिथपर्यंत पोहोचल्यावर त्याने परत आपल्यावर असलेल्या जबाबदारी पार पाडण्यासाठी पुन्हा घर गाठायचं आणि घराचं राखण करायचं.

शेतात येताना जाताना जणू बॉडीगार्डची भूमिका!

जेव्हा कधी रात्री अपरात्री एखाद्या घरातील सदस्याला जर शेतात जावं लागलं तर त्या एकट्या माणसासोबत जोडीदार म्हणून निश्चित वाघ्या असायचा आपण विचारलं सोबत कुणी आहे का ? तर उत्तर एकच यायचं वाघ्या आहे ना... मग काळजी नसायची. घरी स्वयंपाकावेळी परिवारातील सदस्य सोबत वाघ्याचाही स्वयंपाक करावाच लागायचा कारण (शिळ अन्न कधीच खाल्लं नाही)

खाण्याच्या पिण्याच्या निश्चित सवयी

स्वयंपाकात निश्चित संध्याकाळी भाकरी असायची परंतु वाघ्याला भाकरी आवडत नसल्याने दोन गव्हाच्या चपात्या कराव्याच लागायच्या जर कधी जेवणावेळी रागवून त्याला जर चपाती फेकली तर खात नसायचा मग प्रेमाने बोलायचं विनवणी करायची रागवलेल्या माणसाला घरातील कुणीतरी पुन्हा रागायचं मग त्याला आनंद व्हायचा मग तो दिलेल जेवण करायचा जर कधी सणासुदीला सगळेजण एकत्र असतील आणि खालचे घर आणि वरचं घर (हे पोरांनी ठेवलेलं नाव) इकडून तिकडे फेऱ्या न मोजता येतील इतक्या मारणे.

मुलांचा सखा सोबती

दोन्ही घराचे रक्षण करणे व येणाऱ्या जाणाऱ्या सर्व मुलांसोबत जायचं परत यायचं हे काम त्याच असायचं. अंधार पडला असेल आणि जर एखादं घरातील मुल की ज्याला अंधाराची भीती वाटते अशाने जर म्हणाला वाघ्या मला वरच्या घरी सोड की खालच्या घरी सोड वाघ्याची जबाबदारी त्यांनी नेऊन सोडायचं आणि परत जिथे त्याच्या हिशोबाने राखण करण्यासाठी स्वत:ची गरज आहे. त्याठिकाणी त्याने थांबायचं मात्र काही काळही दिसेनासा झाला तर वाघ्या कुठे रे ? हा शब्द प्रत्येकाच्या तोंडून निघाला पाहिजे.

### सण समारंभात त्याची अनिवार्य उपस्थिती

घरातील प्रत्येक समारंभात सहभागी होणे जर कधी ग्रुप फोटो काढायचा असेल तर सर्वांच्यामध्ये येऊन बसणं माझ्याजवळ ये म्हणून बाकीच्यांनी भांडण करणं पण तो सर्वांच्या मध्यभागी बसणार इकडे बघ छान फोटो आला पाहिजे. तोंड पुढे करणार आणि फोटोकडे चांगली पोज देणार.. झालं म्हटलं की निघून जाणार. मात्र जबाबदारी खूप मोठी असायची घराच्या परिसरात जर दुसरा कोणाचं जनावर दुसरा कुणाचं एखादं पाळीव प्राणी किंवा साप जर दिसला तर त्यानं तिथून त्यांना हाकलून देणे किंवा घरातील कुणाला तरी आवाजाने (भुंकून) बोलावून घेणं कारण मेरे अंगने में तुम्हारा क्या काम है...! असं त्याचं असायचं अशा वाघ्याच्या खुप आठवणी आहेत.. सेवानिवृत मुख्याध्यापक बाबासाहेब शेकडे,परिवार दु:खी आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅंक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# देगलूर : बालरुग्णांसाठी आठवड्याचे रात्रीचे ड्युटी वेळापत्रक जाहीर

देगलूर / प्रतिनिधी

शहर व परिसरातील बालरुग्णसेवेतील गैरव्यवस्थेला तोडगा काढत खासगी व सरकारी बालरोगतज्ज्ञांच्या आठवड्याचे रात्रीचे ड्युटी वेळापत्रक निश्चित करण्यात आले आहे. पालकांना अडचण येऊ नये आणि रुग्णसेवा अखंड सुरू राहावी, यासाठी हा निर्णय सोमवारी (ता.११) आमदार जितेश अंतापूरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत घेण्यात आला.

नवीन वेळापत्रकानुसार-

सोमवार : थडके बाल रुग्णालय - डॉ. थडके

मंगळवार : साई गणेश बाल रुग्णालय - डॉ. कस्तुरे

बुधवार : रेखावार हॉस्पिटल - डॉ. रमेश रेखावार

गुरूवार : हाळीकर हॉस्पिटल - डॉ. आनंद जाधव

शुक्रवार : चिंतलवार हॉस्पिटल - डॉ. चिंतलवार

शनिवार : उपजिल्हा रुग्णालय - सरकारी बालरोगतज्ज्ञ

रविवार : उपजिल्हा रुग्णालय - सरकारी बालरोगतज्ज्ञ

नागरिकांना रुग्णालय व डॉक्टरांची माहिती सहज उपलब्ध व्हावी, यासाठी प्रशासनाने हे वेळापत्रक सार्वजनिक केले आहे. आवश्यकतेनुसार पोलिस बंदोबस्त देण्याचेही आश्वासन बैठकीत देण्यात आले.आमदार अंतापूरकर म्हणाले, रुग्णसेवा ही सर्वोच्च सेवा आहे. पालक आणि डॉक्टर यांच्यातील समन्वय वाढवण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. यामुळे कोणत्याही बालरुग्णाला तातडीच्या उपचारासाठी अडचण येणार नाही.




मंठा /प्रतिनिधी -

मंठा शहरातील श्री रेणुका देवी संस्थान येथे श्रावण महिन्यातील बुधवारी देवीभक्त काशिनाथ नागोराव कुलकर्णी यांनी ५२ हजार रुपये किमतीची अर्धा किलो चांदीची पंचारती देवी मंदिरास दान दिली. ही पंचारती पुजारी अमर ठोके यांच्या स्वाधीन करण्यात आली.

दान सोहळ्यावेळी शकुंतला काशिनाथ कुलकर्णी, मंजुश्री मोताले, मिलिंद नाईक, रोहिणी नाईक, महेश नाईक, भगवान कुलकर्णी आदी उपस्थित होते.मंठा येथील श्री रेणुका देवी हे जागृत देवस्थान असून येथे वर्षभर भाविकांची मोठी गर्दी असते. श्रावण महिन्यात तर दर्शन आणि नवस फेडण्यासाठी भाविकांची विशेषतः मोठी उपस्थिती राहते.

## डॉ.रंगनाथन जयंती व राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा.



मुक्रमाबाद /प्रतिनिधी

मुक्रमाबाद येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात १२ ऑगस्ट रोजी भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक, भारताचे पहिले ग्रंथपाल, द्विबिंदू वर्गीकरण पद्धतीचा शोध लावणारे संशोधक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती व राष्ट्रीय ग्रंथपाल दिन महाविद्यालयाच्या ग्रंथालयात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक इनामदार यांच्या हस्ते डॉ.रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी ग्रंथपाल डॉ. विलास पवार, सांस्कृतिक कार्यक्रम विभाग प्रमुख डॉ. रवींद्र बाविस्कर,नॅक समन्वयक प्रा. भारतभूषण बाळबुदधे तसेच डॉ. रामदास मादळे, डॉ. एकनाथभिंगोले, डॉ. सूर्यकांत सकनूरे, संतोष पाटील,डॉ. रमाकांत बिडवे.डॉ. बालाजी खराबे, डॉ. मा.म.गायकवाड, डॉ. मौलाना सय्यद. डॉ. नारायण पांचाळ,प्रा. रवी कुमार ढोकाडे, डॉ.जितेंद्र काळे प्रा.अंकुश शिंदे, उमाकांत गायकवाड, जय बजरंग मुळे, पिंटू शिंदे व विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते.

# परभणी डाक विभागातर्फे दीनदयाळ स्पर्श फिलाटेली शिष्यवृत्ती योजना स्पर्धा परीक्षेचे आयोजन

**परभणी : परभणी डाक विभागातर्फे दीन-दयाळ स्पर्श फिलाटेली शिष्यवृत्ती योजना स्पर्धापरीक्षा २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेमध्ये भाग घेण्याची अंतिम दि. १८ सप्टेंबर, २०२५ असून परभणी डाक विभागांतर्गत येणाऱ्या परभणी, हिंगोली आणि जालना जिल्ह्यांतील जास्तीत जास्त शाळांनी यामध्ये सहभाग नोंदवावा असे आवाहन डाक अधीक्षक सतीश पाठक यांनी केले आहे.**

ही स्पर्धा ही फक्त इयत्ता ६ ते ९ च्या विद्यार्थ्यांसाठी असून सदरील स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांचे पोस्टात फिलाटेली डिपॉझिट अकाउंट असणे आवश्यक असून सदरील खाते फक्त रुपये २०० ने उघडता येईल. जर यापूर्वीच फिलाटेली डिपॉझिट अकाउंट उघडलेले असल्यास नवीन खाते उघडण्याची आवश्यकता नाही. ही स्पर्धा ही २ टप्प्यांची असेल पहिल्या टप्प्यामध्ये सप्टेंबर महिन्याच्या शेवटी डाक विभागातर्फे ५० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल आणि सदरील परीक्षेचे मूल्यमापन राज्यस्तरावर केले जाईल. त्याआधारे इयत्ता ६ ते ९ प्रत्येक इयत्तेच्या राज्यस्तरावरील गुणवत्ता यादीनुसार निवडलेल्या विद्यार्थ्यांना फिलाटेली प्रोजेक्ट तयार करण्यासाठी कळविण्यात येईल. सदरील फिलाटेली प्रोजेक्टच्या आधारे राज्यस्तरावर विद्यार्थ्यांची अंतिम निवड होईल. अंतिम निवड झालेल्या विद्यार्थ्यांना रुपये ६ हजारची शिष्यवृत्ती, प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात येईल.

गेल्या २ वर्षांमध्ये परभणी डाक विभागामध्ये एकूण ११ विद्यार्थ्यांनी सदरील शिष्यवृत्ती पटकावली असून यावर्षीही दीनदयाळ स्पर्श फिलाटेली शिष्यवृत्ती योजना स्पर्धा परीक्षेमध्ये सर्व शाळांनी सहभाग नोंदवून आपल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना भारतीय डाक विभागाची शिष्यवृत्ती पटकवण्याची संधी द्यावी, असे आवाहन डाक अधीक्षक सतीश पाठक यांनी केले आहे. या स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सहाय्यक डाक अधीक्षक (मुख्यालय) पवन मोरे, व कार्यालयीन सहाय्यक श्रीपाद कुंभारकर यांच्याशी संपर्क साधावा, असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# श्रीशा मोटर्स या नवीन शोरुमचा उद्घाटन समारंभ

## उपस्थित राहण्याचे अमोल भैय्या चौधरी यांचे आवाहन

आष्टी (प्रतिनिधी)

श्रीशा मोटर्स या नवीन शोरुमचा उद्घाटन समारंभ शुक्रवार, दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.१५ वा. श्रीशा बिल्डींग कडा रोड धामणगाव, ता. आष्टी, जि. बीड येथे करण्याचे योजिले आहे. या नविन शोरुम दालनाचे उद्घाटन ह. भ. प. बबन महाराज बहिरवाल (अध्यक्ष मदन महाराज संस्थान, कडा व मदन महाराज सेवाश्रम, धामणगाव), ह. भ. प. महंत काशिनाथ महाराज शास्त्री (गणेश गड संस्थान नागतळा) यांच्या शुभहस्ते होणार आहे.



याप्रसंगी प्रमुख उपस्थिती महेबूब भाई शेख (अध्यक्ष रा. यु. का. महा.), अँड. शिवाजी आण्णा कराळे (जेष्ठ विधीज्ञ, अहिल्यानगर), उद्धवबापू दरेकर (मा. सभापती शि. स. जि. प. बीड), विजुभाऊ गोल्हार (मा. जि. प. स. बीड), जयदत्त भाऊ धस (युवा नेते), संजय नाना गाढवे (मा. चेअरमन दुध संघ, आष्टी), सतिष आबा शिंदे (जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी युवक), यश भैय्या आजबे (युवा नेते), श्रीमती. संजनाताई गाढवे (सरपंच धामणगाव), रावसाहेब आबा लोखंडे (मा. पं. स. सदस्य), संदीप साहेब खाकाळ (सरपंच शेरी), सचिन अण्णा लोखंडे (सरपंच मुर्शदपुर), विजय अण्णा गाढवे (तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी युवक शरद पवार गट), सर्व माजी जि. प. व पं. स. सदस्य, सर्व माजी सरपंच व सर्व सदस्य ग्रा.प., सर्व शिक्षक वृंद आणि मित्र परिवार, आप्तेष्ठ, अध्यक्ष, सचिव व सर्व पदाधिकारी, व्यापारी, डॉक्टर, फार्मसिस्ट, हॉटेल असोसिअशन, शिव उद्योग समूहाचे सर्व ग्राहक यांची असणार आहे. तरी या नविन शोरुम च्या उद्घाटन समारंभास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन निमंत्रक अमोल भैय्या चौधरी (मा. सरपंच, धामणगाव तथा मा. पं. स. सदस्य, आष्टी) व मित्र परिवाराने केले आहे.

# ग्रामपंचायतीच्या अनागोंदी कारभाराविरोधात बेमुदत धरणे आंदोलन

आंदोलनकर्त्यांचा आज दुसरा दिवस

परळी / प्रतिनिधी

वित्त आयोग व इतर शासनाच्या सर्व योजनेतून मोहा ग्रामपंचायत हद्दीत सण २०२१-२५ काळात शासनाचा किती निधी प्राप्त झाला व तो ठिकाणासह कोणत्या कामावर खर्च झाला? याचा पारदर्शक तपशील जनतेला देण्यात यावा यासह इतर मागण्या घेत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष व गावकऱ्यांनी ग्राम पंचायतच्या अनागोंदी कारभाराविरोधात ग्राम पंचायत कार्यलयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले असून आज या आंदोलनाचा दुसरा दिवस आहे.

बनावट बोगस लाभार्थी दाखवत गावातील ओबीसींच्या तीन घरकुलाचा निधी हडप करणाऱ्या सर्व दोषींना कठोर शासन करण्यात यावे, वित्त आयोग व शासनाकडून गावाच्या विकासासाठी आलेल्या निधीचा विनियोग कुठे आणि कसा करण्यात आला याचा पारदर्शक तपशील गावकऱ्यांना देण्यात येऊन कोणते काम केले हे गावकऱ्यांना निदर्शनास आणून द्यावे. ग्राम पंचायती कडून सातत्याने ग्रामसभा टाळून पंचायत राज शासन प्रणालीला हरताळ पुसण्याचे काम सुरू ही कार्यपद्धती तात्काळ थांबविण्यात यावी.ग्रामपंचायत बैठका संदर्भात आदल्या दिवशी शॉर्ट निरोप देऊन दुसऱ्या दिवशी अचानक बैठक लावण्याचा व बैठकांमध्ये गोलमाल उत्तरे देऊन वेळ मारून नेण्याचा प्रकार सातत्याने घडत असून हा अनागोंदी कारभार तात्काळ बंद करण्यात यावा, ग्रामपंचायतच्या मासिक बैठकांमध्ये वारंवार या मागण्या संदर्भात प्रश्न उपस्थित करूनही कसलाही प्रतिसाद मिळत नसल्याच्या नाराजीने नाईलाजाने




मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष मोहा शाखा व मोहा ग्रामस्थांच्या वतीने बुधवार दि. १२ पासून मोहा ग्रामपंचायतच्या अनागोंदी कारभाराविरोधात ग्रामपंचायत कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात येत आहे. या बेमुदत धरणे आंदोलनाचा आज दुसऱ्या दिवस आहे. या धरणे आंदोलनात ग्राम पंचायत सदस्य कॉ.प्रवीण देशमुख, कॉ.मदन वाघमारे, माजी सरपंच कॉ.सुदाम शिंदे यांच्यासह संदीप शहाजीराव देशमुख, विशाल शिवाजीराव देशमुख, बाळासाहेब शिवाजीराव देशमुख, विष्णू बाळासाहेब देशमुख, ब्रम्हानंद देशमुख, रमेश महाजन, कुमार महाजन, दत्ता कांबळे, अण्णा शिंदे, वैजनाथ पाळवदे, विश्वाभर वाघमारे, ज्ञानोबा देशमुख, शिवाजी पांचाळ आदींसह अनेक गावकरी उपस्थित आहेत.

# आ.सुरेश धस यांनी केली भगवान रामेश्वराची महापूजा

## सौताडा येथे लाखो भाविकांनी घेतले भगवान रामेश्वराचे दर्शन

आष्टी (प्रतिनिधी)

पाटोदा तालुक्यातील सौताडा येथे डोंगरदरीमध्ये असलेल्या भगवान रामेश्वराची तिसऱ्या सोमवारी आष्टी, पाटोदा, शिरूर चे आमदार सुरेश धस यांनी महापूजा केली. ही पूजा येथील पुरोहित पांडुरंग प्रभाकर देशमुख उर्फ पांडू देवा यांनी केली. बीड जिल्ह्यामध्ये बीड - नगर रोडवर पाटोदा तालुक्यामध्ये सौताडा हे गाव आहे. या ठिकाणी असलेल्या डोंगरदऱ्याच्या कपारीत सुंदर असे भगवान रामेश्वराचे मंदिर आहे. या ठिकाणी मोठा धबधबा असल्याने आणि वनविभागाने हा परिसर विकसित केल्याने अत्यंत सुंदर आणि रमनिय असे हे ठिकाण बनले आहे. या ठिकाणी दर श्रावण सोमवारी यात्रा भरते. श्रावण महिन्यातील तिसरा सोमवार हा विशेष असतो. सोमवारी सकाळी ६ वाजता आष्टी, पाटोदा, शिरुरचे आमदार सुरेश धस, सौताड्याचे सरपंच बाळू घुले, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप काका जाधव यांनी भगवान रामेश्वराची महापूजा केली. या पूजेचे पुरोहित या देवस्थानचे प्रमुख पांडुरंग प्रभाकर देशमुख उर्फ पांडू देवा शास्त्री यांनी केले.



यावेळी भाविकांनी दर्शनाला गर्दी केली होती. सोमवारी दिवसभर हा परिसर भाविकांनी फुलून गेला होता. या निसर्गरम्य ठिकाणी एरवी ही पर्यटकांची गर्दी असते. सोमवारी या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होते. पोलीस विभागाकडून या ठिकाणी मोठा बंदोबस्त लावला जातो. याशिवाय वनविभागाच्या अधिकारी आणि कर्मचारी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून तैनात असतात. सोमवारी सौताडा येथे भगवान रामेश्वराचे लाखो भाविकांनी दर्शन घेतले. मागील काळापासून देवस्थान विकास कामापासून वंचित असून पाहिजे तसा विकास झाला नाही तो मी येणाऱ्या काळात भरून काढत देवस्थानसाठी ब दर्जा प्राप्त करून देणार असून यासाठी शासनाकडे पाठपुरावा सुरू आहे. येणाऱ्या काळात देवस्थानच्या विकास कामांना या माध्यमातून गती मिळणार असून माझा बळीराजा सुखी कर अशी प्रार्थना यावेळी आ. सुरेश धस यांनी भगवान रामेश्वराकडे केली.यावेळी जि. प. सदस्य माऊली जरांगे, माजी नगराध्यक्ष विकास राळेभात, सभापती किरण शिंदे, सरपंच बाळू घुले, सुखदेव सानप, प्रदीप जाधव, शाहूराव टेकाळे, ऋषीकेश सानप, ऋषिकेश शेंम्बडे, काळू शिंदे, बाबासाहेब पुलावळे, बाळू काका शिंदे, भाऊसाहेब शिंदे, अनिल टेकाळे, आश्रू शेळके, अशोक सानप, गणेश सानप, संग्राम सानप, रामहरी सानप, रमेश भोरे, भरत शिंदे, अमोल शिंदे, दत्ता टेकाळे आदी सह प्रमुख मान्यवर,भाविक भक्त

# विविध मुद्द्यांवर शे.का.प, शिवसेना (उबाठा) आणि राष्ट्रीय कॉंग्रेसच्या वतीने तिव्र अंदोलनाचा इशारा

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा तालुक्यातील विविध विकासात्मक मुद्द्यांवर लक्ष केंद्रित करत विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांनी पाटोदा उपविभागीय अधिकारी यांना खालील मुद्द्यांबाबत निवेदन देण्यात आले. पाटोदा येथील ग्रामीण रुग्णालयाला उपजिल्हा रुग्णालयाची मंजुरी देणे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्ज मुक्ती करणे, २०२३ सालातील सतत पावसाच्या खंडामुळे आणि २०२४ सालातील सततच्या पावसामुळे शेतकऱ्याचे खरीप पिकांचे झालेले नुकसान त्यावर विमा कंपनीकडून झालेल्या नुकसानीच्या किती टक्के व कोणकोणत्या पिकासाठी मंजूर केला तो अद्याप मिळाला नाही त्याची सखोल चौकशी करून तो शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यात यावा, पाटोदा येथील जिल्हा परिषद हायस्कूल शाळा चालु करण्यात यावी, मांजरा नदीवरील अधुऱ्या अवस्थेत असलेला ब्रिज कम को.प. बंधारा पूर्ण करण्यात यावा, संजय गांधी योजनेसाठी २१००० /- हजाराच्या उत्पन्नाची अट शिथील करण्यात यावी, दारिद्र्य रेषेचा पुन:सर्वे करण्यात यावा, निराधार योजनेत किमान ५००० /- रुपये वेतन देण्यात यावे, आतंक वाद्यांच्या नावाखाली सामान्य जनतेच्या अधिकारावर बंधन घातलेले जन सुरक्षा विधेयक रद्द करण्यात यावे, देशात गाजत असलेले मतचोरी प्रकरण भारतीय लोकशाहीला काळीमा फासणारे आहे, त्यावर योग्य कार्यवाही करण्यात यावी, पाटोदा तालुक्यातील संजय गांधी / श्रावणबाळ योजनेच्या फाईल (अर्ज) तात्काळ निकाली काढण्यात याव्यात, पाटोदा ग्रामीण रुग्णालय ते शंभर चिरा रस्ता, पाटोदा ते साकत हद्दीपर्यंत रस्ता या




बोगस कामाची आणि पाटोदा ते स्मशानभूमी रस्त्यावरील मांजरा नदीवरील पूल वाहून गेला आहे याची राज्य पातळीवरील विशेष पथकाकडून चौकशी करून अधिकारी व संबंधित एजन्सीवर शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावेत. या वेळी शे.का.प.चे जिल्हा चिटणीस भाई विष्णुपंत घोलप, भागवत नागरे, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस चे तालुकाध्यक्ष राहुल जाधव, राहुल नागरगोजे, ड.विशाल मस्के तसेच शिवसेना उबाठा पक्षाचे तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, युवासेना प्रमुख अजिंक्य डोरले, शिवसेना शहर प्रमुख सोमनाथ लवूळ, सचिव आकाश कांकरिया, अल्पसंख्याक सेल प्रमुख मुन्ना शेख, अजय डोरले हे उपस्थित होते. सदरील मागण्या मान्य झाल्या नाहीत तर लवकरच सर्व पक्षीय तीव्र आंदोलनाचा ईशारा देखील देण्यात आला.

# अंबाजोगाईत १६ ऑगस्ट रोजी कृतज्ञता व जीवनगौरव सोहळ्याचे आयोजन

## पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांच्या हस्ते होणार गायक सुभाष शेप यांचा गौरव

आधार मल्टीस्टेटचा सामाजिक बांधिलकी जोपासणारा उपक्रम

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

अल्पावधीतच महाराष्ट्रात लोकप्रिय ठरलेली व १०० कोटींच्या आतल्या गटामध्ये सलग १० वर्षांपासून प्रथम/ द्वितीय क्रमांक मिळवत असलेली तसेच मागील १३ वर्षांत विविध संस्थांच्या ३६ पुरस्कारांनी सन्मानित झालेल्या, आधार मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड अंबाजोगाई. वतीने सामाजिक बांधिलकी या उपक्रमांतर्गत शनिवारी कृतज्ञता व जीवनगौरव सोहळ्याचे आयोजन अंबाजोगाई येथे करण्यात आले आहे. या सोहळ्यात पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने यांच्या हस्ते गायक सुभाष शेप यांचा होणार गौरव होणार आहे. अशी माहिती आधार मल्टीस्टेटचे चेअरमन ऍड.सुनिल सौंदरमल यांनी दिली आहे.

सामाजिक उपक्रम व आर्थिक साक्षरता अभियाना अंतर्गत आधार मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेड अंबाजोगाई. वतीने कृतज्ञता व जीवनगौरव सोहळा शनिवार, दिनांक १६ ऑगस्ट रोजी अंबाजोगाई येथील अजिंठा हॉल, आधार भवन, दुसरा मजला, राजा बन्सीलाल नगर, दामा हॉस्पिटलच्या शेजारी सायंकाळी ५ वाजता आयोजित करण्यात आला आहे. यावेळी कल्पक व लोकाभिमुख गायक सुभाष शेप यांचा गौरव पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने (माजी संचालक संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन मुंबई.) यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कमलाकर चौसाळकर (सचिव, योगेश्वरी शिक्षण संस्था अंबाजोगाई.) हे असणार आहेत. यावेळी विचारमंचावर दीपकजी वजाळे (उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई.) यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे. तर विशेष निमंत्रित म्हणून पंडित उद्धवबापू आपेगांवकर

(प्रसिद्ध पखावज वादक, अंबाजोगाई.), प्राचार्य डॉ. कमलाकर कांबळे (ज्येष्ठ साहित्यिक, अंबाजोगाई.), अशोकराव गुंजाळ (ज्येष्ठ संपादक, सांज पाखरू अंबाजोगाई.), हे उपस्थित राहणार आहेत. तरी या सन्मान सोहळ्याला अंबाजोगाईकरांनी उपस्थित रहावे असे आवाहन आधार मल्टीस्टेटचे चेअरमन ऍड.सुनिल सौंदरमल, मार्गदर्शक प्रा.डी.जी.धाकडे, ऍड.किशोर गिरवलकर (अध्यक्ष, स्थानिक सल्लागार समिती.), विजय राऊत (मुख्य कार्यकारी अधिकारी) आणि गोविंद आकुसकर (शाखा अधिकारी, अंबाजोगाई) यांनी केले आहे.

# रुपुर येथील आप्पासाहेब येवले या युवकांनी शासनाच्या योजने विरहित केले स्वयंपूर्तीतून केले शेळीपालन

## विविध प्रजातीच्या शेळी उपलब्ध

शिरूर (प्रतिनिधी)

तालुक्यातील रुपूर येथील रहिवासी असलेले आप्पासाहेब येवले हे आपल्या स्वयंप्रेरणेतून नोकरीच्या मागे न लागता व शासनाच्या योजनेचाही फायदा न घेता स्वयंकष्टामधून त्यांनी शेळी पालन चा व्यवसाय हा चालू केला आहे यामध्ये विविध प्रजातीच्या शेळ्या या ठिकाणी ते जोपासत आहे यात प्रामुख्याने उस्मानाबादी, संगमनेरी, बीटल (पंजाब), शिरोही (राजस्थान), गावरान,यासारख्या विविध प्रजातीच्या शेळ्याचे पालन या ठिकाणी केले आहे स्वयं खर्चातून शेडचे उभारणी व चारा पाण्याची व्यवस्था सुद्धा या ठिकाणी व्यवस्थितपणे या शेळ्यांची निगा राखण्याचे काम आप्पासाहेब येवले व त्यांचे कुटुंब करत आहेत त्यामुळे ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराची चालना सुद्धा या माध्यमातून मिळत असून अनेकांनी शेळी पालन व्यवसाय हा करावा बंदिस्त शेळीपालन करून त्यांनी एक प्रकारे यशस्वी बंदिस्त शेळीपालन करून रोजगारही उपलब्ध केला आहे.

येवले हे अगोदर राजकारणात सुद्धा सक्रिय होते माजी मंत्री तथा आमदार सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यकाची जबाबदारी सुद्धा त्यांनी पार पाडली होती तसेच विद्यमान खासदार बजरंग सोनवणे यांचे सुद्धा स्वीय सहायकाची जबाबदारी त्यांनी काही काळ पार पाडली होती. राजकारणातल्या चाली परंपरा गलिच्छ झालेल्या राजकारणामुळे स्वतःला यातून बाजूला ठेवत व्यवसायाची कास त्यांनी धरली आहे राजकारण हे निवडणुकीपुरते करायचे बाकी आपला व्यवसाय सांभाळायचा असेही त यावेळी येवले यांनी व्यक्त केले आहे. अलीकडच्या काळातील गलिच्छ राजकारणातच्या भानगडीत तरुणांनी न पडता स्वतःच्या औद्योगिक व्यवसायावर भर द्यावा व आपलं कुटुंब आर्थिक सक्षम बनवावे कुठल्याही राजकारणाच्या पाठीमागे जाण्यापेक्षा स्वतःच्या कुटुंबाकडे लक्ष केंद्रित करून आपली आर्थिक उन्नती साधावी अशी ही मत येवले यांनी व्यक्त केले आहे.

तसेच या शेळीपालनाला आजी-माजी आमदार सभापती गटविकास अधिकारी कृषी अधिकारी यांनी भेटी दिल्या असून त्याचबरोबर मार्गदर्शनासाठी ही त्यांच्याकडे आष्टी पारगाव शरूर या ठिकाणाहून व जिल्हा बाहेरील सुद्धा लोक सुद्धा त्यांच्या मार्गदर्शनासाठी भेटी घेत आहे.



### वार्षिक पाच लाख रुपये उत्पन्न

एका शेळी पासून सुरुवात करत येवले यांनी लहान मोठे जवळपास ४५ शेळ्यांची व्यवस्था केली आहे या शेड साठी त्यांनी जवळपास अडीच लाख रुपये खर्च केला असून शेळ्यांच्या देखभालीसाठी घरगुती चारापाणी करून पन्नास हजार रुपये खर्च दर्शवला आहे. तसेच त्यांचे आरोग्य अबाधित राहावे यासाठी वारंवार मदत मदत घेत असतात त्याचबरोबर त्यांना मका गहू सोयाबीन हरभरा सरकी पेंड खपरी पेंड शेंगदाणा पेंड यांचे मश्रण करून त्यांना खाद्यही दिले जाते.

# आज पांढरीत ह.भ.प. पुष्पाताई जगताप महाराज यांचे कीर्तन



आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील पांढरी वांढरेवस्ती येथे दि. १० ते १७ आगस्ट याकालावधीत ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा होत आहे. यंदाचे हे चौथे वर्षे आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव तथा श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचा ७५० वा. जन्मोत्सव सोहळानिमित्त पांढरी (वांढरे वस्ती) या परिसरातील सर्व भाविकांच्या सहकार्याने अखंड हरिनाम सप्ताहाचे व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे आयोजन केलेले आहे. पंचक्रोशीतील सर्व भाविकांनी या भव्य दिव्य सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे.

ह. भ. प. प्रशांत महाराज भोगाडे यांच्या मार्गदर्शनाखाली ह. भ. प. धोंडीबाप्पु वांढरे, ह. भ. प. काशीनाथ महाराज शेंबडे, ह. भ. प. सुरज महाराज भगत (देसुर) हे सप्ताहातील व्यासपीठ चालक म्हणून काम पाहत आहेत. ह. भ. प. नानासाहेब महाराज भोगाडे, ह. भ. प. बिभीषण महाराज शिंदे व इतर भाविक मंडळी हे नामजप करीत आहेत. सप्ताहात काकडा, ज्ञानेश्वरी पारायण, नामजप, हरिपाठ, कीर्तनानंतर जेवणाची पंगत होणार आहे. सप्ताहात नामधारक ह. भ. प. आसाराम महाराज केळसांगवीकर यांचे नामजप झाला.

ह. भ. प. नानासाहेब महाराज भोगाडे (पांढरी), ह. भ. प. काकासाहेब महाराज निगुडे (अरणगांव), ह. भ. प. चैतन्य महाराज राठोड (आळंदी) यांचे कीर्तन झाले आहे. आज गुरुवारी ह. भ. प. पुष्पाताई महाराज जगताप (तवलवाडी) यांचे कीर्तन होणार आहे. शुक्रवारी ह. भ. प. शिवाजी महाराज जगताप (टाकळसिंग), शनिवारी ह. भ. प. शिवानंद महाराज पाटील (नाशिक), रविवार दि. १७ आगस्ट रोजी सकाळी १० ते १२ ह. भ. प. कैलास महाराज भोरे (देवदैठण भोरदरा) यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाची सामुदायिक पंगत होणार आहे.

## विकासभू सरपंच नंदकुमार गोरे यांची

# जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती बिनविरोध निवड

पाटोदा (प्रतिनिधी)

जनतेच्या मनात घर करून, शून्यातून विश्वनिर्माण करणारे नेते आणि विधानपरिषद सभापती राम शिंदे यांचे कट्टर समर्थक नंदकुमार (आबा) गोरे यांची जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती पदी बिनविरोध निवड झाली. या निवडीनंतर आपटी गावासह जामखेड तालुक्यात जल्लोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.शेतकऱ्यांचा आधारस्तंभ गेल्या काही वर्षांत सरपंच म्हणून गावात रस्ते,पाणीपुरवठा,शाळा दुरुस्ती, स्वच्छता मोहीम, महिला बचत गट उभारणी अशा अनेक विकास कामांमध्ये गोरेंनी मोलाचा वाटा उचलला आहे. विशेषतः शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणे, पिकांना बाजारभाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे, आणि कृषीक्षेत्रात नव्या योजना राबविणे यामुळे त्यांनी शेतकरी वर्गाचा विश्वास संपादन केला आहे.मला पाठिंबा देणाऱ्या संचालक मंडळाचे, ग्रामस्थांचे आणि सभापती साहेबांचे मी आभार मानतो. शेतकरी हितासाठी, पारदर्शक व्यवहारांसाठी आणि आधुनिक सुविधा निर्माण करण्यासाठी मी कायम प्रयत्नशील राहीन, अशी प्रतिक्रिया नंदकुमार (आबा) गोरे, उपसभापती, जामखेड कृषी उत्पन्न बाजार समिती.यांनी दिली गोरे यांच्या निवडीने जामखेड तालुक्यासह आपटी गावात ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. सोशल मीडियावरूनही मोठ्या प्रमाणात अभिनंदन संदेशांचा वर्षाव होत असून, विविध स्तरांतील मान्यवरांनी त्यांचे कौतुक केले आहे.



# सकारात्मक इतिहासाच्या मांडणीतूनच राष्ट्राला गतवैभव प्राप्त होईल- डॉ. शरदराव हेबाळकर

माजलगाव (प्रतिनिधी)

सकारात्मक इतिहासाच्या मांडणीतूनच राष्ट्राला गतवैभव प्राप्त होईल असे प्रतिपादन अखिल भारतीय इतिहास संकलन योजनेचे माजी राष्ट्रीय महासचिव व ज्येष्ठ इतिहास तज्ञ डॉ. शरदराव हेबाळकर यांनी केले. सिद्धेश्वर महाविद्यालय इतिहास विभाग, अखिल भारतीय इतिहास संकलन योजना, इतिहास संकलन संस्था महाराष्ट्र व इंडियन कौन्सिल ऑफ हिस्टॉरिकल रिसर्च नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर नेतृत्व, सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक पुनर्जागरण या विषयावर आयोजित दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेच्या समारोपप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी भा. शि. प्र.प्र.संस्थेच्या उपाध्यक्षा ज्योतीताई ठाकूर या तर स्थानिक शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी, कार्यवाह अँड. विश्वास जोशी, अभय कोकड, एकनाथ जाधव, प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी, संयोजक डॉ.गोरक्षनाथ फसले, डॉ केदारनाथ मालू, डॉ. रवी सातभाई, डॉ. धनंजय जवळेकर यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना डॉ. शरदराव हेबाळकर म्हणाले की, नकारात्मक इतिहासाच्या मांडणीमुळे मध्यंतरीच्या काळात भारतीयांचा आत्मविश्वास हा खालावलेला दिसून येत होता. परंतु अहिल्यादेवी सारख्या देशभक्त व स्वातंत्र्यसेनानींचा इतिहास तोही खरा इतिहास आपण जर समाजासमोर आणला तर आजची परिस्थिती बदलल्याशिवाय राहणार नाही.अध्यक्षियसमारोपातज्योतीताई ठाकूर म्हणाल्या की, अहिल्यादेवी होळकरांचे कार्य आपण इंदोर या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष रूपाने जर पाहिले तर त्यांचा आदर्श पुढच्या पिढीला मार्गदर्शक ठरेल. समारोप सत्रात डॉ. केदारनाथ मालू यांनी दोन दिवशीय राष्ट्रीय परिषदेत अन्नदान केल्यामुळे त्यांचा व ऐतिहासिक शिल्पसृष्टी प्रदर्शनी लोकांसमोर साकारल्यामुळेसेवानिवृत्त शिक्षक उद्धव विभुते यांचा देखील विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यशाळेविषयी वैशाली पुष्कर, बेबी घोरगे, केदार वाघमारे यांनी कार्यशाळेच्या सकारात्मक आयोजनाबाबत मनोगते व्यक्त केली. कार्यशाळेत पेपर वाचन केल्याबद्दल बेबी घोरगे व सुवर्णा बुरांडे दोन संशोधक विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ. गोरक्षनाथ फसले यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.लक्ष्मीकांत सोन्नर यांनी केले तर आभार प्रा. प्रतिभा जाधव यांनी मानले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.




# धैर्य, संयम व उदात्तेचे प्रतीक म्हणजे अहिल्यादेवी होळकर- बालमुकुंद पांडे

माजलगाव (प्रतिनिधी)

धैर्य, संयम व उदात्तेचे प्रतीक म्हणजे अहिल्यादेवी होळकर होय असे प्रतिपादन अखिल भारतीय इतिहास संकलन योजना संघटन कार्यवाह बालमुकुंदपांडे यांनी केले. ते सिद्धेश्वर महाविद्यालयात इतिहास संकलन संस्था (देवगिरी प्रांत ) द्वारा आयोजित तिसऱ्या प्रांतीय अधिवेशनात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.अध्यक्षस्थानी केंद्रीय अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर हे तर केंद्रीय कार्यवाह डॉ .हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय सदस्य प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, उमेश जगताप, श्रीरंग गोसावी, डॉ. व्यंकटेश लांब, डॉ. राधाकृष्ण जोशी, विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे उपस्थित होते. पुढे बोलताना बालमुकुंद पांडे म्हणाले की, लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी महिला सक्षमीकरणाचे कार्य प्रभावीपणे केले. देशाची स्वाभिमानता वाढविण्यासाठी त्यांचे योगदान महत्वाचे ठरते. सोरटी सोमनाथ येथे त्यांनी शिवलिंगाची स्थापना करून संपूर्ण भारतभर अनेक शिवमंदिरे निर्माण केली. राधाकृष्ण जोशी, श्रीरंगी जोशी,अमरनाथ खुर्पे, उमेश जगताप, डॉ.व्यंकटेश लांब, डॉ. हेमंत वैद्य यांनी समायोचित मनोगत व्यक्त केले.परिषदेच्या अध्यक्षीय समोरोपात अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलूरकर म्हणाले की, इतिहासाचे विकृतीकरण हे स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात देखील करण्यात आले परंतु आता खऱ्या अर्थाने आपणास सजग होऊन एक नवा इतिहास लिहिण्याची व वाचकांसमोर आणण्याची गरज आहे. प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी केले. चैतन्य आहेर यांनी वैयक्तिक पद्य सादर केले. सूत्रसंचालन डॉ.रमेश गटकळ यांनी केले तर आभार डॉ. गोरक्षनाथ फसले यांनी मानले. अँड. विश्वास जोशी, सुरेंद्र रेदासनी, एकनाथ जाधव तसेच महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य व स्थानिक पदाधिकारी तसेच प्राध्यापक व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

### यांचा झाला सन्मान

या राष्ट्रीय परिषदेमध्ये सु. ग. जोशी (लातूर) यांना बाबासाहेब आपटे ज्येष्ठ इतिहास संशोधक पुरस्कार, डॉ. प्रभाकर देव (नांदेड) स्वर्गीय मोरोपंत पिंगळे शैक्षणिक कार्य पुरस्कार, प्रा. डॉ. राजेंद्र ननवरे (जळगाव) यांना स्वर्गीय हरिभाऊ वाकणकर शिक्षक पुरस्कार, हेमंत पोखरणा (कडा जिल्हा बीड) यांना स्वर्गीय डॉ. सतीश मित्तल संघटन पुरस्कार, मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



# प्राचार्य सुरेश बोडखे यांच्या परिवाराचा आदर्श

आष्टी (राजेंद्र लाड)

मनुष्याचे कुटुंब हे सर्व स्वास्थ्य जीवनाला योग्य ठिकाणी, योग्य मार्गाने जाण्याचा धडा परिवार देत असतो आणि म्हणून ज्येष्ठांच्या संस्काराच्या शिदोरीतून लहान मुलावर संस्कार घडत असतात. असे संस्कार आष्टी तालुक्यातील बोडखे परिवारात घडले असून आजोबांची उत्कृष्ट सेवा मनोभावे करत नातवाने पाळलेला धर्म आणि वडिलांनी केलेले संस्कार यातून बोडखे परिवाराने निर्माण केलेला आदर्श आष्टी तालुक्यात चर्चेचा विषय झाला आहे. आष्टीचे माजी आमदार आणि शिक्षण महर्षी भीमराव धोंडे असून त्यांच्या संकल्पनेतून निर्माण झालेले पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालय आहे. या विद्यालयातून मोठमोठ्या पदावर विविध क्षेत्रात मान्यवरांनी आपले स्थान निर्माण केलेले आहे. केवळ शिक्षणातील पदेच नाहीत तर संस्काराचे आदर्श निर्माण करण्याचा या विद्या मंदिराचा एक वेगळा आदर्श आहे. याच पंडित नेहरू विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक सुरेश बोडखे आणि प्रा. डा. राम बोडखे यांचे वडील गहिनीनाथ बोडखे सध्या ९५ वर्ष वयाचे आहेत. बोडखे यांचे अत्यंत वृद्धावस्थेमध्ये सेवा करण्याचे भाग्य मुख्याध्यापक सुरेश बोडखे यांना लाभले आहे.

सकाळ, दुपार, संध्याकाळ त्यांची मनोभावे सेवा करत चहा, पाणी, नाश्ता, जेवण देण्याचे काम त्यांच्याकडून होत आहे. प्राचार्य सुरेश बोडखे यांचे कर्तव्य परिसरात आदर्श मानले जात आहे. मुख्याध्यापक सुरेश बोडखे यांनी निर्माण केलेले संस्कार त्यांचा मुलगा आजोबांची सेवा करून पुढे नेताना दिसतो आहे. परिवारातील संस्कार चांगल्या परिवाराचे लक्षण असते हे या निमित्ताने अधोरेखित झाले आहे. सातत्याने अस्थिरता भारताच्या कट्टर दुष्मनांची विविध स्तरावर व्यापक प्रमाणात समाजहिता विभागाची धोरणे त्यामुळे भीतीचे वातावरण अशा परिस्थितीत स्वतंत्र्याचा क्षण हा ज्येष्ठांसाठी परमानंदाचा तर तरुणांसाठी तो स्वर्गीय क्षण होता! अशा शब्दात ज्येष्ठ नागरिक तथा आपल्या वयाची ९५ पार केलेल्या गहिनीनाथ (नाना) बोडखे यांनी आठवणींना उजाळा दिला. आष्टी तालुक्यातील आदर्श गाव सराटेवडगाव - आनंदवाडी हे तालुक्यातील कृषीविषयक आवड असलेले आणि सर्व गुणांनी युक्त असे आदर्शगाव आहे. माजी सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे यांच्या संकल्पनेतून या गावच्या विकासासाठी अनेक योजना केल्या. गावची शिस्त, एकोपा आणि गावच्या विकासासाठी सर्वांनी पुढे येणे या वैशिष्ट्यांनी या गावची परंपरा..अशा आदर्श गावातील माजी चेअरमन गहिनीनाथ बोडखे हे ९५ वर्षाचे जेष्ठ नागरीक ते भारताच्या स्वातंत्र्याचे साक्षीदार आहेत. तरुणांशी गप्पा मारताना ते सांगतात पं. जवाहरलाल नेहरु यांना अहिल्यानगर जिल्ह्यातील गुरव पिंपरी या गावी तलावाचे भुमीपुजन कार्यक्रमास आले असताना आपण त्यांना जवळुन पाहिले. त्यांच्यासमवेत लहान इंदिरा गांधी होत्या हे ही विशेष आठवण ते सांगतात.

देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा ते अत्यंत तारुण्यात म्हणजे केवळ १५ वर्षांचे होते. ऐन उमेदीचा काळ असल्याने त्यांनी हा क्रांतीकारिक क्षण स्वतः अनुभवल्याचे त्यांच्या बोलण्यातून दिसून आले. त्यांनी त्या काळात अनुभव केलेले कार्य ऐकताना उपस्थितांच्या अंगावर अक्षरशः शहारे येत होते. प्रत्येक तरुणांमध्ये भारत स्वतंत्र होईल या एकच अपेक्षेने प्रचंड चैतन्य उत्स्फूर्तता निर्माण झाली होती. अंगात नवा जोश होता, नवी चेतना होती. स्वातंत्र्याची पहाट येईल ही आशा होती आणि तो क्षण १५ ऑगस्ट १९४७ रूपाने अवतरला आणि सबंध भारत मातेच्या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर आनंदाचे भाग्य उजळले. हे सांगताना त्यांचा आत्मविश्वास प्रचंड दूनावला होता. ११ वर्षांचे गहिनीनाथनाना हे सराटेवडगाव - आनंदवाडीचे माजी सरपंच प्रा. डॉ. राम बोडखे व पं. नेहरु विद्यालयाचे प्राचार्य तथा मुख्याध्यापक सुरेश बोडखे यांचे वडील आहेत. यावेळी त्यांनी अनेक किस्से ऐकवले. त्या काळामध्ये विहिरीमध्येमध्ये पोहणे, पहाटे मोट हाकणे, नांगरणी करणे, गवत कापणे, व्यायाम करणे, दूध पिणे, भजन करणे, लग्न वरातीत सोंग आणणे, लेझीम डाव खेळणे आदि आवडी, छंद जोपासत समाजाच्या हिताच्या गोष्टी करत राष्ट्रधर्म हे आम्ही निभावत होतो. हे त्यांनी प्रकर्षांने सांगितले.

यावेळी जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, इंजि. पी. बी. बोडखे, सेवानिवृत्त पीएसआय शेख अन्सारभाई, प्रा. डा. जी. पी. बोडखे, माऊली बोडखे, लक्ष्मणबुवा बोडखे, झुंबर बोडखे, रामभाऊ बोडखे, सेवानिवृत प्राचार्य आदिनाथ बोडखे, मुख्याध्यापक साईनाथ बोडखे, शिवाजी बोडखे, सौ. कौशाबाई झुंबर बोडखे, प्राचार्य तथा मुख्याध्यापक सुरेश बोडखे आदि उपस्थित होते. कुटुंबाचा संस्कारमय प्रवास गेल्या अनेक पिढ्यांचा. गहिनीनाथ बोडखे (नाना) यांची जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे यांनी भेट घेतली. यावेळी बोलताना मुख्याध्यापक सुरेश बोडखे म्हणाले की, गेल्या अनेक पिढ्यांपासून आमच्या कुटुंबामध्ये प्रत्येकाचा आदरभाव करून ज्येष्ठांची सेवा अखेरपर्यंत करणे ही सर्वांची रीत आहे. माझा मुलगा माझ्या वडिलांची म्हणजे त्याच्या आजोबाची सेवा करतो. हा परिवाराचा अनेक पिढ्यांपासून चालेला सेवाधर्म आहे. हे विशेष कार्य नसून केवळ कर्तव्य असल्याचेही ते म्हणाले.



## वडिलांच्या संस्काराची परंपरा!

# देश बदलायचा असेल तर शेतकरी आर्थिक उन्नत झाला पाहिजे - मयंक गांधी

## कृषिकुल येथे संवाद माध्यम प्रतिनिधींशी कार्यक्रमास जिल्हाभरातील पत्रकारांची उपस्थिती

परळी (प्रतिनिधी)

जुन्या काळात आपला देश हा सोने की चिडिया म्हणून ओळखला जायचा. मध्यंतरीच्या काळात काळानुरूप बदल होत गेले. येथील लोकजीवन, वातावरण, पर्यावरणातील बदल आणि संसाधनांमध्ये खूपच मोठे बदल झाले आहेत. आज देशाची अवस्था सुधारण्यासाठी अनेक स्तरावरून प्रयत्न होतात. अनेक लोकसेवी संस्था आणि लोकसेवक सुधारणावादी काम करत असल्याचे पाहायला मिळते. मात्र जर देशाला घडवायचे असेल तर सर्वप्रथम शेतकऱ्यांची अर्थव्यवस्था सुधारली पाहिजे असे मत ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांनी व्यक्त केले. बुधवार, दिनांक १३ ऑगस्ट रोजी सिरसाळा येथील कृषिकुल येथे आयोजित संवाद माध्यम प्रतिनिधींशी या कार्यक्रमात जिल्हाभरातून उपस्थित असलेल्या पत्रकार बांधवांशी संवाद साधत असताना ते बोलत होते. यावेळी महाराष्ट्र शेती सहाय्य मंडळाचे विश्वस्त विजय अण्णा बोराडे, ग्लोबल विकास ट्रस्टचे विश्वस्त हरिश्चंद्र वंगे यांची उपस्थिती होती.

कृषिकुल येथे आयोजित केलेला संवाद माध्यम प्रतिनिधींशी कार्यक्रम बुधवारी पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस उपस्थित असलेल्या पत्रकार बांधवांचे शेतकरी टोपी आणि रुमाल देऊन स्वागत करण्यात आले. पुढे बोलताना जलनायक मयंक गांधी म्हणाले की, मी सुरुवातील देश पातळीवर राजकीय जीवनात काम केले आहे. परंतु राजकारणाची परिभाषा, त्यातील खेळ आपल्याला अजिबात जमणार नाहीत हे माझ्या जेव्हा लक्षात आले तेव्हा मी ते सोडून दिले. मला खेड्यातील गरीब शेतकऱ्यांसाठी काम करायचे होते. तशी इच्छा उत्पन्न झाल्यानंतर ते कुठे करायचे? असाही प्रश्न पडला. तेंव्हा महाराष्ट्रातील सर्वात दुष्काळी भाग म्हणून मराठवाडा ओळखला जायचा, त्यातला त्यात बीड जिल्हा. म्हणून असा एक विचार आला की याच भागाला आपण बदलूया. जर आपण हे करू शकलो तर आपण देशात कुठेही काम करू शकतो असे माझ्या लक्षात आले आणि २०१६ पासून मी इथे काम करतोय. सुरुवातीच्या काळात काही मोजक्या गावात लोकांना सोबत घेऊन काम केले. त्यानंतर कामाची व्याप्ती वाढत गेली आणि आजही वाढतच आहे. आज आम्ही ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून जवळपास ४ हजार गावांमध्ये पोहचू शकलो आणि तिथे काम करत आहोत. जलसंधारणासाठी वेगवेगळ्या गावात आणि नद्यांवर काम केल्यानंतर करोडो लिटर पाणी जमिनीत मुरले आणि पाण्याची पातळी वाढलेली आहे. ज्याचा फायदा शेतकऱ्यांच्या पिकांसाठी झाला. पाणी मिळाले परंतु शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढवायचे? असा प्रश्न होता. तेंव्हा आम्ही शेतकऱ्यांना रेशीम शेती आणि फळबाग लागवडीसाठी प्रवृत्त केले. शेतीतील खर्च कमी करून जास्त उत्पन्न कसे मिळेल यासाठीचे तंत्रज्ञान आम्ही शेतकऱ्यांना दिले. टाटा सामाजिक संस्थेने या कामाचा सर्व्हे केल्यानंतर ग्लोबल विकास ट्रस्टने केलेल्या कामामुळे मोठा बदल होऊन त्यांचे उत्पन्न कित्येक पटीने वाढल्याचा निष्कर्ष काढला. शेतकऱ्यांचे हजारांचे उत्पन्न आम्हाला लाखांत करायचे असल्याचेही त्यांनी या कार्यक्रमात बोलतांना सांगितले.

शेतकऱ्यांच्या भविष्यासाठी कृषिकुल

जगातील सर्वात हिम्मतवान माणूस जर कोण असेल तर तो शेतकरी. मातीत घाम गाळायचा, राबराब राबायचे, काबाडकष्ट करायचे असाच त्याचा जीवनप्रवास असतो. तो कायम अडचणीत आणि आर्थिक विवंचनेत असतो. मात्र असे असतांनाही तो कधी कोणावर नाराज होत नाही. आता त्याच्या जीवनात आनंदाचे क्षण आणायचे असा आपण पक्का निश्चय केलेला आहे. त्यांना शाश्वत शेतीचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण कृषिकुलच्या माध्यमातून आम्ही देत आहोत. शेतकऱ्यांनी इथं यावं, शिकावं आणि आधुनिक पद्धतीने शाश्वत शेती करून आर्थिक उन्नती साधावी असेही मयंक गांधी म्हणाले.

कृषिकुल परिसराची पाहणी व अवलोकन

कृषिकुल संवाद माध्यम प्रतिनिधींशी कार्यक्रमास संबंध बीड जिल्ह्यातून पत्रकार बांधवांची उपस्थिती होती. या कार्यक्रमास उपस्थितांनी कृषिकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्रात उपलब्ध सर्व सुविधांची पाहणी केली. ज्यामध्ये पाणलोट व्यवस्थापन कक्ष, माती परीक्षण प्रयोगशाळा, पिक संरक्षण कक्ष, शेती अवजार कक्ष, सेंद्रिय निविष्ठा कक्ष, गोशाळा, कंपोष्ट खत विभाग, बायोगॅस विभाग, स्वयंचलित सिंचन प्रणाली, हवामान मापक प्रणाली आदींची पाहणी करून अवलोकन केले.

# वैद्यनाथ अर्बन बँकेचे नवनिर्वाचित संचालक प्रवीण देशपांडे यांचा चतुर्वेद प्रतिष्ठान च्या वतीने सत्कार संपन्न




केज/प्रतिनिधी

नुकतीच पार पडलेली दि वैद्यनाथ अर्बन को-आप बँक लि.परळी च्या सर्वसाधारण निवडणुकीमध्ये ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या निवडणुकीमध्ये जनसेवा पॅनलच्या सर्व च्या सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले असून यामध्ये केज येथील उमेदवार प्रवीण भाऊसाहेब देशपांडे यांना देखील प्रचंड मते मिळाले असून ते निवडून आले आहेत. याबद्दल केज येथे चतुर्वेद प्रतिष्ठानच्या वतीने प्रवीण देशपांडे यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी धनंजय कुलकर्णी,चंद्रकांत पाटील,श्रीधर खोत, शिवराज मुथळे,अनंत कोकीळ,गजानन औसेकर,दिनकर नाईकवाडे,ऋषिकेश जोशी,घेवारे,किरण अस्वले आदी उपस्थित होते.सत्काराबद्दल प्रविण देशपांडे यांनी सर्वांचे आभार मानले तसेच बकेच्या माध्यमातून आपण सर्वसामान्य माणसाला व्यवसाय करण्यासाठी प्रोत्साहन देणार असुन वैद्यनाथ अर्बन को-आप बॅकेत व्यवहार करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.



# वडवणी तालुक्यातील १४ गावांमध्ये एनजीओचा एकात्मिक ग्रामविकास प्रकल्प सुरू

बीड(प्रतिनिधी)

वडवणी तालुक्यातील १४ गावांमध्ये LTI Mindtree Foundation व दिलासा एनजीओ यांच्या संयुक्त विद्यमाने एकात्मिक ग्रामविकास प्रकल्पांतर्गत विविध विकासकामांना गती देण्यात येत आहे. या कामांमध्ये जल व मृदसंवर्धनासाठी सिमेंट नाला बांध, माती नाला बांध, शेततळे, तसेच काही संरचनांची दुरुस्ती व गाळ काढणे यांचा समावेश आहे.शेतकऱ्यांना त्यांच्या शेतात रोजगार उपलब्ध व्हावा, तसेच अतिरिक्त उत्पन्न मिळावे या उद्देशाने आजपर्यंत २८ हजार आंब्याच्या रोपांचे वाटप करण्यात आले आहे. याशिवाय विविध कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम, सीएससी सेंटर, बचत गटांना सहकार्य, घरगुती ओला कचरा निर्मूलनासाठी उपक्रम अशा अनेक योजना राबविण्यात येत आहेत.या सर्व उपक्रमांमुळे गावांचा सर्वांगीण विकास साधत असून,

# हरकी लिमगाव शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड




सलग तिस-यांदा वर्षी बिनविरोध निवड

माजलगाव (प्रतिनिधी)

तालुक्यातील हारकी लिमगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड झाली असुन सलग तिस-यांदा बिनविरोध निवड होणारी ही जिल्हा परिषद शाळा ठरली आहे. आरटीई ॲक्ट २००९ अंतर्गत प्रति दोन वर्षानंतर नविन शालेय व्यवस्थापन समितीची पुर्नगठण करण्यात येते. त्यानुसार दि. १३ ऑगस्ट २०२५ बुधवार रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हारकी लिमगाव येथे नविन शालेय व्यवस्थापन समितीची बिनविरोध निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्ष म्हणुन रामेश्वर भगवान शिंदे, उपाध्यक्ष सौ. ज्योती आसाराम नवगरे, सदस्य म्हणुन सौ. अश्विनी गोविंद शिंदे, सौ. गंगासागर भरत गायकवाड, सौ. अंबिका शिवाजी बोबडे, हनुमंत विठ्ठल कोल्हे, अनिल वंकर निसर्गंध, राजेभाउ दशरथ फुनगे, नारायण प्रभाकर रंजवे, राजेभाउ उत्तम कोल्हे, दत्तात्रय शिवाजी आरडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. सलग तिस-यांदा शालेय समिती निवड बिनविरोध होणारी ही शाळा ठरली आहे. निवडीबद्दल गटशिक्षणाधिकारी रविंद्र महामुनी, जेष्ठ अधिव्याख्याता श्रीकिशन देशमुख, विस्तार अधिकारी श्री. राठोड, श्रीमती कापसे, लक्ष्मण पोटभरे,आयाज सिद्दीकी, सचिन मोती यांनी अभिनंदन केले आहे. निवडीसाठी निरीक्षक म्हणुन केंद्रपमुख समाधान शिंदे यांनी काम पाहिले. यावेळी शालेय व्यवस्थापन समिती कार्यकारणीचा सत्कार करण्यात आला. यावेळी मा. सभापती सखाराम शिंदे, चेअरमन बबनराव शिंदे, राजेभाउ शिंदे, मा. उपसरपंच अण्णा शिंदे, संचालक आप्पा उजगरे, विक्रम रंजवे व गावातील पालक, शिक्षणप्रेमी नागरिक यांची उपस्थिती होती. निवडीसाठी मुख्याध्यापक पी. जी. देशपांडे, शिक्षक लक्ष्मण सरवदे, अंगद कवडे, उध्दव शिल्पे, भिमा राठोड, सत्यभान भुंबे, महादेव बोचरे, रेश्मा वंजारे, भारत राउत, श्री. भदर्गे, श्री. मुळे, राम कटारे, किशोर बोबडे यांनी सहकार्य केले.

# बनसारोळा येथील आदर्श विद्यालयात स्वातंत्र्य दिनानिमित्त निबंध स्पर्धा संपन्न



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील बनसारोळा येथे स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून आदर्श माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.या स्पर्धेत पाचवी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. एकूण ७० विद्यार्थ्यांनी देशभक्ती,स्वातंत्र्याचे महत्त्व आणि आपल्या देशाच्या गौरवशाली परंपरेवर आधारित विषयांवर सुंदर निबंध लिहिले.स्पर्धेचेआयोजन करताना सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. रोकडे एस.व्ही.व श्री. मांदळे एस.सी.यांनी विशेष पुढाकार घेतला. स्पर्धा सुरळीत पार पडावी यासाठी शिक्षक वर्गानेही सक्रिय सहकार्य केले. मुख्याध्यापिका श्रीमती सिंधुताई चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण उपक्रम अत्यंत शिस्तबद्ध वातावरणात पार पडला.या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांमध्ये लेखन कौशल्य वाढीस लागले तसेच देशभक्तीची भावना दृढ झाली. विजेत्या विद्यार्थ्यांना येत्या स्वातंत्र्य दिन सोहळ्यात प्रमाणपत्र व पारितोषिके देण्यात येणार आहेत. हा उपक्रम विद्यार्थ्यां साठी प्रेरणादायी ठरल्याची भावना व्यक्त करण्यात आली.



# आष्टीकरांसाठी एक नवी चव,नवा अनुभव...

आष्टी (प्रतिनिधी)

गेल्या २० वर्षांपासून आष्टीकरांच्या सेवेत ग्राहकांच्या प्रेम आणि आग्रहाखातर आता घेऊन येत आहोत अत्याधुनिक साधनसामग्रीसह एक नवा आयाम ! न्यू डायमंड बेकरी. या बेकरीचा भव्य शुभारंभ शुक्रवार दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.११ वाजता उमर नगर, नगरपंचायत कार्यालयाच्या पाठीमागे आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथे मा.आमदार सुरेश (आण्णा) धस यांच्या शुभहस्ते होणार आहे.

याप्रसंगी प्रमुख मान्यवर उपस्थिती मा. भीमरावजी धोंडे साहेब (माजी आमदार), मा. साहेबरावजी दरेकर नाना (माजी आमदार), मा. बाळासाहेब आजबे काका (माजी आमदार), मा. देविदास आबा धस (मा. जि. प. सदस्य), मा. शंकर देशमुख साहेब (भा. ज. पा. जिल्हाध्यक्ष, बीड), मा. सतिश आबा शिंदे (मा. जि. प. सदस्य), मा. मेहबूब शेख (युवक प्रदेशाध्यक्ष), आष्टी शहराचे नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष सर्व नगरपंचायत अधिकारी, पदाधिकारी, नगरसेवक, आष्टी तालुका व्यापारी असोसिएशन यांची असणार आहे. तरी या न्यू डायमंड बेकरी उद्घाटन सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्रोप्रा. सय्यद शाहनवाज शरीफ यांनी केले आहे.

# संतश्रेष्ठ भगवानबाबाची शिकवण मानवी जीवनाचा उद्धार करण्यासाठी

## शिक्षण संस्थेच्या माध्यमातुन सोमनाथ बडेंनी डोंगरपट्यात गरिबांच्या दारात ज्ञानाची गंगा आणली:- राम कुलकर्णी(फोटो)




वडवणी(प्रतिनिधी)

संतश्रेष्ठ भगवानबाबा ईश्वरी अवताराचं स्वरूप असुन तत्कालीन काळात त्यांनी शिक्षणाचे महत्व पटवुन देताना स्वत:च्या जीवनाचा उद्धार करण्यासाठी काहीही करा पण लेकरांना शिक्षण द्या ही त्यांची शिकवण समाज उद्धारासाठी कामी आल्याचे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी करताना चिंचवण डोंगरपट्यात सोमनाथ बडेंनी शिक्षण संस्थेच्या माध्यमातुन गरिबांच्या दरवाजात ज्ञानाची गंगा आणली. परोपकारी स्वभाव असल्याने त्यांच्यावर सर्वसामान्य माणसं प्रेम करतात असं त्यांनी सांगितले.

मक्रध्वज शिक्षण संस्था संचलित भगवानबाबा माध्यमिक विद्यालयात ध्वजारोहण प्रसंगी प्रवक्ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आसाराम बडे, सोमनाथ बडे, नवनाथ तांबडे, अरूण बडे, शेख आबेद, श्रीमंत तांबडे, अर्जुन पौळ, विष्णु डोंगरे, दत्तु तुरे, इंद्रसेन बडे, यशवंत धायतिडक, नारायण बडे, शहादेव बडे, बद्रीनाथ म्हात्रे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. राम कुलकर्णी यांच्या शुभ हस्ते ध्वजारोहण झाल्यानंतर शाळेच्या वतीने मान्यवरांचा शाल, श्रीफळ देवुन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातुन उपसरपंच मयुर बडे यांनी संस्थेच्या गुणात्मक कार्याचा आढावा सादर केला. प्रसंगी बोलताना सोमनाथराव बडे म्हणाले की, शिक्षण संस्था ज्या उद्देशापोटी स्थापन केली, तोच आदर्श डोळ्यासमोर ठेवत आम्ही काम करतो. गुणवत्तेच्या बाबतीत आमची शाळा डोंगरपटच्यात चांगलं काम करत असुन त्याचे श्रेय मुख्याध्यापक, शिक्षकांना जाते. गोरगरिबांच्या सुखदु:खात जगणं हाच माझा खरा धर्म असुन लोकांचं प्रेम वर्षानुवर्षापासुन मला मिळतं त्याचा खुप आनंद वाटतो. मार्गदर्शनपर बोलताना प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी आपल्या भाषणात अहिल्यादेवी होळकरांचा संदर्भ देत त्यांचं चरित्र मुला-मुलींनी वाचन करावं. तत्कालीन काळात त्यांनी कशा प्रकारे जीवन जगताना जनकल्याणाची कामे केली?एक महिला कर्तृत्वाच्या आधारावर प्रदेशाचा कारभार आदर्शवत कशी करते?, दु:ख कितीही नशिबाला आलं तरीही शुद्ध भाव कर्माने त्यावर सामना करत धार्मिकतेच्या आधारे भारतीय संस्कृती टिकवुन ठेवताना त्यांनी ज्योतिर्लिंगाचा केलेला जीर्णोद्धार त्यांची पुस्तके वाचुन प्रेरणा घेतली तर बालवयातच आयुष्यात पुढे जाण्यासाठी यश निश्चित मिळते. संतश्रेष्ठ भगवानबाबांनी संपुर्ण आयुष्य जनकल्याणासाठी समर्पित करताना ऊसतोड कामगार असो किंवा समाजातील अठरापगड जातीधर्माच्या उद्धारासाठी दिलेले योगदान फार मोठं एकरभर विका पण मुलं-मुली शिकवा हा त्यांचा संदेश खर्या अर्थाने जनकल्याणाच्या अत्यंत हिताचा होता. त्यांच्याच नावाने इथे शाळा चालवताना बाबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवत सोमनाथ बडेंनी आयुष्यात गोरगरिबांची केलेली सेवा लोक कधीच विसरत नाहीत. सत्ता असो अथवा नसो त्यांच्या पाठीशी गोरगरिबांचा आशिर्वाद असतो.




**केज/प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील कुंबेफळ येथे प्रती वर्षाच्या परंपरेनुसार यावर्षी रविवार रोजी श्री विठ्ठल बिरुदेवाच्या भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले.धनगरी ओवीगायन कार्यक्रम संपन्न झाला.ढोल,झांज,अब्दागिरी व छत्री,आणि निशान पताका घेऊन सलग पाऊल खेळत ही भंडाऱ्याची उधळण करत परज निघाली.बिरुदेव वीर देवांचा हेडाम पार पडले त्यानंतर महाप्रसाद झाला या कार्यक्रमा साठी परिसरातील मोठ्या प्रमाणात वीरकरी नागरीक उपस्थित होते.गावातील ग्रामस्थ,सर्व क्षेत्रातील मंडळी मोठया संख्येने सहभागी झाले होते.कार्यक्रम यशस्वीतेसाठी गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.**

# स्वरूपा सुंदर संगीता नाईकवाडे यांना महाराष्ट्र शासनाचे विशेष सेवा मेडल जाहीर

केज /प्रतिनिधी

केज शहरातील पत्रकार सुंदरराव नाईकवाडे यांची कन्या पोलिस उपनिरीक्षक स्वरूपा सुंदर संगीता नाईकवाडे ह्या जुन २०२२ मध्ये पी एस आय ची ट्रेनिंग पुर्ण केल्यानंतर प्रथम नेमणूक त्यांना गडचिरोली येथे देण्यात आली एक महिना गडचिरोली येथे परत नक्षल विरोधी मोहिमेत काम करण्यासाठीत्यांना



विशेष ट्रेनिंग देण्यात आली. एक महिन्यानंतर त्यांना धानोरा येथील पोलिस ठाणे येथे नेमणुक देण्यात आली वर्ष २०२२ ते २०२५ ह्या तीन वर्षांत स्वरूपा नाईकवाडे यांनी अनेक मोहीमेत भाग घेतला अतिदुर्गम भागात त्यांनी चांगले काम केले तेथील आदिवासी भागातील नागरिकांची उत्तम सेवा केली. महाराष्ट्र शासनाच्या अनेक योजना आदिवासी बांधवापर्यंत पोंहचवल्या तरुणाईला शासकीय,निमशासकीय सेवेत नौकरीच्या खूप संधी आहेत त्यासाठी मार्गदर्शन शिबिरात कार्य केले.पॉक्सो अंतर्गत अनेक गुन्ह्यात त्यांनी मुलींना न्याय मिळवुन देण्याचे काम केले.त्या कामी त्यांना पोलिस अधीक्षक गडचिरोली यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र ही देण्यात आले.

या तीनवर्षातील त्याच्या चांगल्या कामा बद्दल पोलिस उपनिरिक्षक स्वरूपा नाईकवाडे यांना महाराष्ट्रशासनाचा पुरस्कार पोलिस विशेष सेवा पदक जाहीर करण्यात आहे दि.१५ ऑगस्ट रोजी त्यांना हे पदक प्रदान करण्यात येणार आहे.तीन वर्षाच्या छोट्या कालावधी मध्ये हे पदक त्यांना मिळाल्या बद्दल स्वरूपा नाईकवाडे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.